पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध

RNINO.MAHMAR/2013/57952


वर्ष : १४ अंक : ११७ पाने ८ किंमत २ रुपये

गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६





# पिंपळवंडीत दहा वर्षीय मुलीवर अत्याचार करून हत्या



नराधम आरोपी
पांग्या उर्फ साहिल खैरे

» सायकल शिकवण्याच्या बहाण्याने उसाच्या शेतात नेले; शेजारी राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाला अटक

» आरोपीला फाशीची मागणी करत संतप्त ग्रामस्थांचा पुणे–नाशिक महामार्गावर रास्ता रोको

जनप्रवास : प्रतिनिधी

**नारायणगाव : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना १८ ऑगस्ट रोजी भरदिवसा घडली. या घटनेमुळे पिंपळवंडीसह संपूर्ण उत्तर पुणे जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. शेजारी राहणाऱ्या २२ वर्षीय पांग्या उर्फ साहिल खैरे याने ओळखीचा गैरफायदा घेत सायकल शिकवण्याच्या बहाण्याने मुलीला उसाच्या शेतात नेले. तेथे तिच्यावर अत्याचार केल्यानंतर गळा आवळून तिची हत्या केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून गुन्ह्याबाबत महत्त्वाची माहिती मिळविण्यात आली आहे.**

**बेपत्ता मुलीचा शोध घेताना उलगडा :** मंगळवारी दुपारनंतर मुलगी घरी परतली नसल्याने कुटुंबीयांनी तिचा परिसरात शोध सुरू केला. बराच वेळ शोध घेऊनही मुलगी आढळून न आल्याने तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर आळेफाटा पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. पिंपळवंडी गावातील स्थानिक युवक, सोपान लेंडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीही मुलीच्या शोधासाठी पुढाकार घेतला. पोलिसांसोबत परिसरातील खासगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. या तपासादरम्यान आरोपी साहिल खैरे याच्या हालचाली संशयास्पद आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर मुलीचा मृतदेह कुठे टाकला, याची माहिती आरोपीने पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याच्या माहितीच्या आधारे मृतदेहाचा शोध घेतला.

**गुन्ह्यानंतर शोधकार्यात सहभागी :** या प्रकरणातील धक्कादायक बाब



म्हणजे, मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्यानंतर आरोपी स्वतः तिच्या शोधकार्यात सहभागी झाला होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये अधिक संताप निर्माण झाला आहे. मात्र, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर माहितीच्या आधारे आरोपीच्या हालचालींचा माग काढत त्याला ताब्यात घेतले आणि चौकशीतून घटनेचा उलगडा केला.

**वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची घटनास्थळी भेट :** घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर, सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांच्यासह पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली.

● पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे. सीसीटीव्ही फुटेज, आरोपीचे जबाब आणि अन्य उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास पुढे नेला जात आहे.

### » संतप्त ग्रामस्थांचा पुणे–नाशिक महामार्गावर रास्ता रोको

घटनेनंतर पिंपळवंडी परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले. आरोपीला आमच्या ताब्यात द्या आणि त्याला तात्काळ फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी करत संतप्त ग्रामस्थांनी गुरुवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्ग काही काळ रोखून धरला. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला. ग्रामस्थांनी या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करावा, खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा आणि आरोपीला कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी केली. पोलिस आणि महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

### » कठोर कारवाईची मागणी

अल्पवयीन मुलीवर झालेल्या या अत्याचार आणि हत्येच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. तपास जलदगतीने पूर्ण करून न्यायालयीन प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.दरम्यान, पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, या प्रकरणातील सर्व बाबींचा तपास सुरू आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

## संक्षिप्त

### लोहेगावमधील 'हॉटेल चूल मटण'चा परवाना निलंबित : तुकाराम मुंढेंचा दणका

पुणे (जनप्रवास) : सध्या सर्वत्र तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईची चर्चा असून, अन्न भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करत त्यांचे परवाने थेट निलंबित केले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून, अन्नपदार्थांची सुरक्षितता आणि स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने लोहेगाव येथील 'हॉटेल चूल मटण'वर नुकतीच कारवाई करत त्यांचा परवाना तात्काळ निलंबित केला आहे. तसेच, जोपर्यंत आवश्यक त्या सुधारणा केल्या जात नाहीत, तोपर्यंत संबंधित हॉटेलने कोणताही अन्न व्यवसाय करू नये, असे सक्त निर्देशही एफडीएने दिले आहेत. राज्यात सध्या अन्नपदार्थांची सुरक्षितता आणि स्वच्छतेची खात्री करण्यासाठी तपासणी मोहीम सुरू असून, या मोहिमेअंतर्गत नगर रोड परिसरातील लोहेगाव (जुना खराडी जकात नाका, खांदवे नगर) येथील 'हॉटेल चूल मटण'ची नुकतीच तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान संबंधित हॉटेलमध्ये अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या स्वच्छता आणि आरोग्यविषयक निकषांचे पालन होत नसल्याचे, तसेच अन्नसुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत बाबींची पूर्तता केली नसल्याचे उघडकीस आल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

**पुणे विभागात धडक कारवाई :** पुणे विभागात १४ ते १७ ऑगस्ट दरम्यान अन्न व औषध प्रशासनाने तीन आस्थापनांची तपासणी केली. या कारवाईत तब्बल १0 लाख ७ हजार ४६0 रुपये किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. या गंभीर प्रकरणी तीन आस्थापनांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, सात जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच, यातील दोन आस्थापना सील करण्यात आल्या असून प्रतिबंधित मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहनही प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

**मुंबईतही कारवाईचा बडगा; सहा मोठ्या हॉटेल्सचे परवाने निलंबित :** पुण्यापाठोपाठ मुंबईतील अन्न सुरक्षा विभागाने देखील सहा मोठ्या हॉटेल्सवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

## पुणे रेल्वे स्थानकात तिकिट केंद्रातील कर्मचाऱ्यावर चाकूने हल्ला

### ४.९१ लाखांचा मुद्देमाल लुटला; दोन चोरट्यांचा शोध सुरू

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारातील तिकिट विक्री केंद्रातील कर्मचाऱ्यावर चाकूने वार करून चोरट्यांनी रोकड आणि मौल्यवान वस्तू लुटल्याची घटना मंगळवारी (१८ ऑगस्ट) मध्यरात्री घडली. या हल्लयात कर्मचारी जखमी झाला असून, दोन चोरटे पसार झाले आहेत.

केल्विन सोलोमन मायला (वय २९, रा. धायरकर कॉलनी, मुंढवा) असे जखमी कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री एकच्या सुमारास केल्विन तिकिट विक्री केंद्रातील २६ हजार ६८५ रुपयांची रोकड मुख्य कार्यालयात जमा करण्यासाठी निघाले होते. त्यावेळी दोन चोरट्यांनी त्यांना अडवून चाकूचा धाक दाखवला आणि तिकिट केंद्रात नेले. केल्विन यांनी प्रतिकार केल्यानंतर झालेल्या झटापटीत चोरट्यांनी त्यांच्या हातावर चाकूने वार केला.

यानंतर चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील पाच तोळ्यांची सोनसाखळी, रोकड आणि दोन मोबाइल असा सुमारे ४ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला. एवढेच नव्हे, तर केल्विन यांचे हातपाय बांधून तोंडात रुमाल कोंबून चोरटे पसार झाले.

## शासकीय नोकरीच्या आमिषाने महिलेची २४ लाखांची फसवणूक : पर्वती पोलिसांनी दोघांविरुद्ध केला गुन्हा दाखल

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुण्यात शासकीय नोकरीचे आमिष दाखवून एका महिलेची २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी पर्वती पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सूर्यकांत विठ्ठल सपकाळ (वय ४६, रा. तळेगाव दाभाडे) आणि योगेश अदिकराव पाटील (वय ४२, रा. कोल्हापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. पर्वती पोलीस ठाण्यात एका ४५ वर्षीय महिलेने याबाबत फिर्याद दिली आहे. ही महिला पर्वती भागातील लक्ष्मीनगर वसाहतीत राहते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेची डिसेंबर २०२३ मध्ये आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींपैकी एकाने आपण महसूल खात्यात अधिकारी असल्याचे महिलेला सांगितले. त्याने मंत्रालयात ओळख असल्याचे भासवून महसूल, सार्वजनिक बांधकाम, समाजकल्याण, कृषी आणि राज्य उत्पादन शुल्क या विविध विभागांमध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले.

या आमिषाला बळी पडून महिलेने आरोपींना वेळोवेळी एकूण २४ लाख रुपये दिले. त्यानंतर आरोपींनी महिलेला समाजकल्याण आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या असलेली नियुक्तीपत्रे दिली.

## वीजेचा धक्का बसून दोन चुलत भावांचा मृत्यू

### ओम आणि रोहित भोईटे यांचा दुर्दैवी अंत; दौंड तालुक्यातील सोनवणेमळा गावावर शोककळा

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : सध्या पावसाळा सुरू असल्याने शेतात किंवा गावखेड्यातील महावितरणच्या विद्युत यंत्रणांपासून अधिक सुरक्षितता बाळगणे गरजेचे असते. त्यात, शेतात मोटर चालू करताना असो किंवा शेतातून हायव्होल्टेज विजेची वायर गेली असल्यास तिथेही काळजी घेणे असो, महावितरणच्या आवाहनापेक्षा नागरिकांनीही स्वतः सावध राहायला हवं. कारण, विजेचा धक्का बसून दोन चुलत भावांचा मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली आहे. दौंड तालुक्यातील सोनवणेमळा गावात या दुर्दैवी घटनेनंतर शोककळा पसरली आहे. राहू गावातील सोनवणेमळा येथे विजेच्या धक्क्याने चुलत भावांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. घरातील काम सुरू असताना विजेचा तीव्र धक्का बसून दोन चुलत भावांचा जागीच मृत्यू झाला. ओम भोईटे आणि रोहित भोईटे अशी मृतांची नावे आहेत, आज सकाळी ही घटना घडली. अनिल भोईटे यांच्या घरी सकाळच्या सुमारास घरगुती वीजेचं काम सुरू होते. त्यावेळी ओम यास अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. ओमला विजेचा धक्का बसल्याचे लक्षात येताच त्याचा चुलत भाऊ रोहित मदतीसाठी धावला. मात्र, ओमला वाचविण्याच्या प्रयत्नात रोहितलाही विद्युत प्रवाहाचा तीव्र धक्का बसला.

## केंद्रीय मंत्री मोहोळ यांच्या रेल्वे प्रशासनाला ठोस सूचना : पुणे विभागातील विकासकामे, सुरक्षा आणि अतिक्रमणांवर भर

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील विविध प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रातील खासदारांच्या बैठकीत त्यांनी रेल्वे प्रशासनाला विकासकामांना गती देण्यासोबतच प्रवाशांची सुरक्षितता, मूलभूत सुविधा आणि रेल्वेच्या मालमत्तेचे संरक्षण यावर ठोस सूचना केल्या.

मोहोळ यांनी पुणे रेल्वे स्थानकाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन महत्त्वाचे निर्देश दिले. प्रस्तावित अतिरिक्त सहा प्लॅटफॉर्मच्या कामाचे नियोजन प्रवाशांची सोय, सुरक्षितता आणि वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून दीर्घकालीन दृष्टिकोनातून करावे, जेणेकरून भविष्यात वारंवार फेरबदल करण्याची वेळ येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

रेल्वे स्थानकावरील सुरक्षेच्या प्रश्नावरही



त्यांनी विशेष भर दिला. स्थानकावरील सर्व अनधिकृत प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग तातडीने बंद करावेत, तसेच संरक्षक भिंत अधिक मजबूत करावी, अशी सूचना त्यांनी केली. स्थानकाच्या प्रवेशद्वारांवर २४ तास टीसी आणि आरपीएफ कर्मचारी उपलब्ध करून देण्याबरोबरच अधिकाधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणीही त्यांनी केली.

पावसाळ्यात पुणे रेल्वे स्थानक परिसरात, प्लॅटफॉर्मवर आणि कार्यालयांमध्ये पाणी साचणे व गळती होण्याच्या समस्यांवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश मोहोळ यांनी दिले. पार्सल कार्यालयात पावसाचे पाणी शिरून ग्राहकांच्या मालाचे नुकसान होऊ नये यासाठीही दीर्घकालीन उपाययोजना करण्याची सूचना करण्यात आली.

## सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सुधारीत शुल्क रचनेमुळे विद्यार्थ्यांना मिळणार परताव्याचा लाभ

### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या निर्देशानुसार सीओईपी प्रशासनाचा निर्णय

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केलेल्या शुल्क रचने संदर्भात विविध क्षेत्रातून आणि विद्यार्थ्यांकडून निवेदन प्राप्त झाले होते. सदर विषयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या मागणीप्रती असलेली संवेदनशीलता आणि उच्च व तंत्र शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याची शासनाची भूमिका लक्षात घेऊन मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या दालनात मा. अपर सचिव श्री. रेड्डी आणि इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत काल मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी सविस्तर चर्चा करण्यात आली.



विद्यार्थ्यांच्या या मागणीला अतिशय सकारात्मक प्रतिसाद म्हणून या शैक्षणिक वर्षासाठी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात प्रवेशासाठी जाहीर केलेल्या सर्व शुल्क रचनेची फेररचना करावी, असे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले.

विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या परताव्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, या उद्देशाने विद्यापीठाने शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारीत शुल्क रचना करावी, असे मार्गदर्शित व निर्देशित केले. (एफआरए) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि मा. मंत्री महोदयांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शुल्क रचनेतील इतर शुल्क (Other Fee) हे शैक्षणिक शुल्कात (Tuition fees) समाविष्ट करावे, असे निर्देशित केले आहे.

या सुधारीत शुल्क रचनेमुळे इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ/NT), ईडब्ल्यूएस (EWS) तसेच एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना (Girls students) शासनाकडून मिळणाऱ्या शिक्षण शुल्क परताव्याचा अधिकाधिक लाभ मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेण्यासाठी योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या प्रशासनाने राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

# अग्रलेख : आगामी निवडणुका अन् जाणत्यांसमोर आव्हाने

आगामी लोकसभा आणि उत्तर प्रदेशसह विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुका लक्षात घेता भाजपने राष्ट्रीय कार्यकारिणीची नवीन टीम जाहीर केली आहे. त्यामध्ये खासदार विनोद तावडे यांच्याकडे राष्ट्रीय सरचिटणीसपदाची जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर काहीशा बाजूला पडलेल्या स्मृती इराणींचे पुनरागमन झाले आहे. त्याचसोबत राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे यांनाही पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत संधी देण्यात आली आहे. राम माधव यांच्यावरही राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नितीन नवीन यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली. केंद्रीय संघटनेतून अमित मालवीय यांची उचलबांगडी हा सर्वांत मोठा बदल आहे. त्यांना पक्षाच्या राष्ट्रीय आयटी सेल प्रमुखपदावरून हटवण्यात आले असून त्यांच्या जागी छत्तीसगडचे दीपक म्हस्के यांची भाजपच्या आयटी सेल आणि सोशल मीडिया प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीत उत्तर प्रदेशच्या मुस्लिम नेत्याला संधी देण्यात आली आहे. तारिक मन्सूर यांचे नव्या कार्यकारिणीत नाव आहे. ते उत्तर प्रदेशच्या विधान परिषदेचे आमदार आहेत. ओबीसी मुस्लिम समुदायाला आपल्याकडे वळवण्यासाठी भाजपचा हा प्रयत्न असल्याचे म्हटले

वास्तविक दीर्घ प्रतीक्षेनंतर राजस्थानात डावलल्या गेलेल्या वसुंधरा राजे यांना पक्ष संघटनेत मानाचे स्थान मिळाले. त्याचप्रमाणे स्मृती इराणी यांनादेखील मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. बिहारमध्ये यशस्वी कामगिरी करणाऱ्या विनोद तावडे यांच्यावर पक्षाने मोठा विश्वास दाखवला आहे. पियुष गोयल यांच्याकडे पक्षाचा खजिना सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आली आहे, भारती पवार यांचेही पुनर्वसन करण्यात आले. बिहारची विधानसभा निवडणूक भाजपसह एनडीएला मोठ्या फरकाने जिंकून देणाऱ्या तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशच्या संघटनेची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात विधानसभेची निवडणूक आहे. भाजपसाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची आहे. उत्तर प्रदेशाचा निकाल पुढच्या लोकसभेची दिशा ठरविणारा असेल. वरकरणी उत्तर प्रदेशात भाजपची स्थिती मजबूत भासत असली, तरी पक्ष संघटनेत अनेक अंतर्गत मतभेद आहेत. उत्तर प्रदेशात जातीची समीकरणे नेहमीच प्रभावी ठरत आली आहे. ठाकूर योगी आदित्यनाथ यांना पक्षातील ब्राह्मण आणि इतर उच्च जातींच्या नेत्यांचा विरोध आहे. शिवाय दलीत आणि मुस्लिम मतदार देखील मोठ्या प्रमाणात भाजपच्या विरोधात आहेत. लोकसभा निवडणुकीत याच दोन समाज घटकांनी भाजपला धडा शिकवला होता. या पृष्ठभूमीवर पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपची कसोटी लागणार हे निश्चित.

या परिस्थितीत संपूर्ण पक्ष संघटनेला एकत्र बांधून कामाला लावण्यासाठी खमक्या नेतृत्वाची गरज होती. सुनील बन्सल यांना उत्तर प्रदेशच्या संघटन महामंत्री पदावरून दूर करण्यात आल्यानंतर प्रदेश संघटनेची जबाबदारी गेल्या काही वर्षात कोणत्याही बड्या नेत्याला देण्यात आलेली नव्हती. उत्तर प्रदेश भाजपला एका कुशल संघटकाची गरज होती. राधा मोहन सिंह यांच्यानंतर उत्तर प्रदेश भाजप प्रभारी पद रिक्त होते. गेल्या काही दिवसांपासून विनोद तावडे अनौपचारिकपणे उत्तर प्रदेशात समन्वयाचे काम पाहात होते. मंत्रिमंडळ विस्तारातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. बिहारमध्ये भाजपप्रणित एनडीएने गेल्याच वर्षी दणदणीत विजय मिळवला. त्या निवडणुकीची सूत्रे भाजपने तावडे यांच्याकडेच दिली होती. भाजपच्या विजयात आणि सम्राट चौधरी यांना मुख्यमंत्री करण्यात तावडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बिहारमध्ये संघटनात्मक पातळीवर तावडेंनी केलेल्या कामाचे कौतुक झाले होते. गेल्या अनेक वर्षांपासून विनोद तावडे संघटनेत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. २०२९ मध्ये देशात लोकसभेची निवडणूक होईल. त्याआधी होत असलेली उत्तर प्रदेशची विधानसभा निवडणूक लोकसभेची सेमी फायनल मानली जात आहे. २०२४ मध्ये उत्तर प्रदेशात भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे केंद्रात मोदी सरकारला पहिल्यांदाच मित्रपक्षांच्या टेकूवर सत्ता स्थापन करावी लागली. २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात भाजपला फटका बसल्यास त्याचे परिणाम २०२९ मध्ये दिसू शकतात. उत्तर प्रदेशात २०१७ आणि २०२२ मध्ये भाजपने स्वबळावर सत्ता स्थापन केली. आता २०२७ मध्ये स्वबळाचा आकडा गाठून सत्ता स्थापनेची हॅट्रिक करण्याचे आव्हान तावडेंसमोर असेल.

सन १९५२, १९५७, १९६२ मध्ये काँग्रेसने उत्तर प्रदेशात बहुमताचा आकडा ओलांडला होता. १९६७ आणि १९६९ मध्ये काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला. पण त्यांना बहुमताचा आकडा गाठता आलेला नव्हता. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची स्थिती फारशी मजबूत नसली, तरी कदाचित समाजवादी पक्षाला सोबत घेऊन हा पक्ष किंवा ही आघाडी भाजपसमोर मोठे आव्हान उभे करू शकते. भूतकाळात उत्तर प्रदेशातील उच्चवर्णीय जातींचा ओढा काँग्रेसकडेच राहिला. आपल्या त्या मतपेढीला काँग्रेसने पुन्हा एकदा आपल्याकडे खेचण्यात यश प्राप्त केले, तर उत्तर प्रदेशचा निकाल बदलू शकतो. एकूणच या विधानसभा निवडणुकीत भाजपसमोर मोठआव्हान उभे राहू शकते व कदाचित म्हणूनच बिहारमध्ये आपल्या कर्तबगारीची चुणूक दाखविणाऱ्या विनोद तावडे यांना पक्षाने मोठ्या विश्वासाने उत्तर प्रदेशची जबाबदारी सोपविल्याची दिसते.

## अंतरंग

### बदलत्या भू-राजकीय पटावर नवे गेम

सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की या तीन देशांनी केलेला 'मक्का संयुक्त संरक्षण करार' केवळ लष्करी नाही. जागतिक सत्ता समीकरणांमध्ये होत असलेल्या एका मोठ्या पुनर्रचनेची ती नांदी आहे. गेल्या काही दिवसांत पश्चिम आशिया आणि दक्षिण आशियाई प्रदेशातील भू-राजकीय वातावरणात वेगाने हालचाली होत आहेत. मक्का संयुक्त संरक्षण कराराच्या निमित्ताने एकीकडे नवीन सुरक्षा चौकटी आकाराला येत आहेत, तर दुसरीकडे हूती बंडखोरांच्या हल्ल्यांसारख्या घटनांमधून या प्रदेशातील अस्थिरतेची दाहकताही प्रकर्षाने जाणवत आहे.

मक्का करार हा या तिन्ही देशांच्या दृष्टीने एक धाडसी पाऊल आहे. करारातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे 'सामूहिक संरक्षण'. या तरतुदीनुसार, या तीनपैकी कोणत्याही एका देशावर झालेला सशस्त्र हल्ला हा तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल. नाटोच्या प्रसिद्ध 'कलम ५' शी साधर्म्य दर्शवणारी ही तरतूद, या कराराची व्याप्ती आणि गांभीर्य स्पष्ट करते. या युतीचे स्वरूप समजून घेताना तिन्ही देशांचे आपापले अजेंडे लक्षात घेणे गरजेचे आहे. सौदी अरेबिया, जो पारंपरिकपणे अमेरिकेच्या सुरक्षा छत्राखाली होता, तो आता आपली रणनीतिक स्वायत्तता वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. अमेरिकेच्या मध्यपूर्वेच्या भूमिकेतील अनिश्चितता आणि इराणचा वाढता प्रभाव पाहता, सौदीला एका विश्वासार्ह प्रादेशिक भागीदाराची गरज होती. तुर्कीसाठी ही युती इस्लामिक जगातील नेतृत्वासाठी होणाऱ्या चढाओढीत आपले स्थान अधिक बळकट करण्याची संधी आहे, तर पाकिस्तानसाठी हा करार त्यांच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेला आणि लष्करी प्रतिष्ठेला सावरण्यासाठी एक 'लाईफलाईन' ठरू शकतो.

पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की यांची ही युती केवळ संरक्षणापुरती मर्यादित राहिलेली नाही. यात तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त लष्करी सराव आणि गुप्तचर माहितीची देवाणघेवाण यांचा अंतर्भाव आहे. विशेषतः तुर्कीचे प्रगत ड्रोन तंत्रज्ञान आणि पाकिस्तानची अण्वस्त्र सज्ज लष्करी ताकद यांचा मेळ घातल्यास, ही युती पश्चिम आशियातील एक प्रभावी लष्करी शक्ती बनू शकते. मात्र, हे सर्व चित्र जितके बाहेरून सुसंगत दिसते, तितकेच ते अंतर्गत विरोधाभासांनी भरलेले आहे. एकीकडे हे देश लष्करी कराराच्या माध्यमातून सुरक्षा वाढवण्याचे स्वप्न पाहत असताना, दुसरीकडे वास्तवातील हिंसाचार वेगळीच गोष्ट सांगत आहे. नुकताच नजराण प्रांतात झालेला हूती बंडखोरांचा हल्ला हे याचे उत्तम उदाहरण आहे. सौदी अरेबियाच्या सीमेवर झालेल्या या हल्ल्यात ११ नागरिक जखमी झाले, ज्यात लहान मुलांचाही समावेश होता. सौदी लष्कराचे प्रवक्ते तुर्की अल-माल्की यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध करत याला आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे उल्लंघन म्हटले आहे. हे हल्ले हे केवळ स्थानिक संघर्ष नसून, ते या प्रदेशात किती खोलवर अस्थिरता आहे, याचे निदर्शक आहेत. येमेनमध्ये एप्रिल २०२२ मध्ये संघर्षविराम करार होऊनही, तिथे शांतता प्रस्थापित होण्याऐवजी संघर्षाची नवी लाट येत असल्याचे दिसत आहे. हूती बंडखोरांच्या या वाढत्या आक्रमकतेमुळे सौदी अरेबियाच्या दक्षिण सीमा सातत्याने तणावाखाली आहेत. मक्का करार अशा वेळी झाला आहे, जेव्हा प्रादेशिक सुरक्षेची गरज सर्वोच्च स्तरावर आहे, परंतु त्याच वेळी अशा हल्ल्यांमुळे या कराराच्या प्रभावीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. भारतासाठी ही संपूर्ण घडामोड एका 'सतर्कतेच्या इशाऱ्या'सारखी आहे. जेव्हा सौदी अरेबिया भारताचा मित्र असताना पाकिस्तान आणि तुर्कीशी अशी घनिष्ट लष्करी युती करतो, तेव्हा भारताला आपल्या पश्चिम आशियाई धोरणाचे पुनर्रावलोकन करावे लागते. या त्रिपक्षीय आघाडीमुळे प्रादेशिक सत्तासंतुलन बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः तुर्कीने ज्या प्रकारे काश्मीरसह अनेक मुद्द्यांवर भारताच्या विरोधात भूमिका घेतली आहे, ते पाहता या युतीतील तुर्कीचा सहभाग भारतासाठी चिंतेचा विषय ठरतो. सौदी अरेबिया एकाच वेळी भारताशी आणि या त्रिपक्षीय गटाशी संबंध कशा प्रकारे हाताळतो, हे त्यांच्या मुत्सद्देगिरीचे मोठे आव्हान आहे. भारताला आता पश्चिम आशियात केवळ जुन्या संबंधांवर अवलंबून न राहता, नवीन धोरणात्मक पूल बांधावे लागतील. आपल्या सुरक्षेचे हित जपण्यासाठी भारताला अधिक सक्रिय आणि प्रखर मुत्सद्देगिरीची गरज आहे. थोडक्यात सांगायचे तर, मक्का करार आणि हूती हल्ले या दोन भिन्न घटना असूनही, त्या एकाच व्यापक चित्राचे भाग आहेत. हा प्रदेश आता बाह्य शक्तींवर (विशेषतः अमेरिका आणि पाश्चात्य जगावर) अवलंबून न राहता, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी प्रादेशिक आघाड्यांकडे वळत आहे. देश आता आपल्या सोयीनुसार नवीन गटांची निर्मिती करत आहेत, जे जागतिक व्यवस्थेच्या बदलत्या रूपाचे लक्षण आहे.

ही युती प्रादेशिक शांततेसाठी सकारात्मक ठरेल की संघर्षाला अधिक तीव्र करेल, हे येणारा काळच ठरवेल. मात्र, एक गोष्ट स्पष्ट आहे की, पश्चिम आशियातील हा बदलता हिंसाचार आणि नवनवीन लष्करी करार, हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी अत्यंत कठीण परीक्षा पाहणारे आहेत. आता या करारात चीन नसला तरी आगामी काळात हे त्रिकुट आणि चीन या सर्वांचाच विचार भाराताला करणे क्रमप्राप्त आहे. शत्रूचा शत्रू आपला मित्र या न्यायाने चांडाळ चौकडी उभी राहणे आणि त्याद्वारे धोका निर्माण होणे घातक आहे. यापुढे भारताला अधिक सजग रहावे लागेल आणि दूरदृष्टीने पावले टाकावी लागतील. जेणेकरून आपल्या देशाचे रक्षण करतानाच आगामी काळातील धोकाही संपुष्टात आणता येईल. शेवटी, सौदी-पाकिस्तान-तुर्की यांचे हे त्रिकूट किती काळ टिकेल आणि ते आपल्या उद्दिष्टांमध्ये किती यशस्वी होईल, यावर अनेक प्रश्नचिन्हे आहेत. परंतु, या कराराने हे सिद्ध केले आहे की, पश्चिम आशिया आता बदलला आहे आणि या बदलत्या जगात आपले स्थान सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपल्या चाली पुन्हा एकदा विचारपूर्वक आखणे भाग पडणार आहे.

**– अस्मिता देसाई**

## राजकारण

# मुंबईत आजपासून मराठी न येणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा पवित्रा; प्रसंगी बॅच, लायसन्स रद्द

मराठी न येणाऱ्या रिक्षा- टॅक्सीचालकांची आजपासून (दि. २०) खैर नाही. त्यांना संधी देऊनही मराठी संभाषणापुरते न बोलणाऱ्या रिक्षाचालकांवर आता कारवाईचा बडगा उगारला जाईल. आरटीओचं वायूवेग पथक जागेवर बॅच-लायसन्स सस्पेंड करणार, असा पवित्रा परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी घेतला. नियमाचे पालन न केल्यास चालकाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. त्यामुळे आजपासून अमराठी रिक्षाचालकांवर कारवाईची टांगती तलवार आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह मनसेच्या आक्रमक पवित्र्यानंतर शासनाने मराठीची सक्ती करण्याचा निर्णय घेतला. शिक्षणातही मराठीचा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. असे असताना महाराष्ट्रात राहून मोठ्या प्रमाणात अमराठी माणसांकडून संभाषणास टाळाटाळ केली जाते. त्यातल्या त्यात अमराठी रिक्षा, टॅक्सीचालकांकडूनही मराठी बोलण्यास टाळाटाळ केली जाते. यातून वादही निर्माण होतो. यामुळे गेल्या वर्षी रिक्षाचालक,



टॅक्सीचालकांसाठी मराठी संभाषणाची सक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सोबतच त्याबाबत शिकण्यासाठी सहा महिन्यांची संधीही देण्यात आली होती. त्याची मुदत संपली आहे.

**अनेक वर्षांपासून मुंबईसह राज्यभरात मराठी**

मुंबईसह महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालकाला मराठी येत नसल्यास त्याचे थेट लायसन्स आता रद्द करण्यात येणार आहे. या शासन निर्णयासंदर्भात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठोस भूमिका घेत आता कारवाईचा इशारा दिला आहे. याच मुद्दयावर बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, मराठी सक्ती केली जात असली तरी ती न येणाऱ्या चालकाला सुरुवातीला एक महिन्याची नोटीस देऊन भाषा शिकण्याची संधी दिली जाईल. नोटीस देऊनही मराठी न शिकल्यास चालकाचे लायसन्स ३ महिन्यांसाठी निलंबित केले जाईल. तर त्यानंतरही नियमाचे पालन न केल्यास चालकाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे. मराठी शिकला नाहीत तर कारवाई अटळ आहे. व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे. व्हिडिओ रेकॉर्ड करून त्याला लायसन्स, बॅच दिली जाईल. लायसन्स देताना डोमेसाईल तपासावे लागेल. आरटीओचे वायुवेग पथक आहे. ज्यांच्याकडे मराठी प्रशिक्षणाचे सर्टिफिकेट नाही व मराठीही बोलता येणार नाही, त्यांच्यावर करवाई केली जाईल. असा ईशाराही मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

**मग्रुरी, मुजोरीला कायद्याने उत्तर देवू**

मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेल्या उत्तर भारतीय रिक्षा चालक असलेला संजय दुबे याने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत विरोध केला आहे. 'जो उत्तर भारतीय रिक्षा चालक मराठी बोलणार नाही त्याचे लायसन्स रद्द करण्यात येईल असा इशारा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

पण मी रिक्षा पण चालवणार, पैसे देखील कमावणार आणि मराठीही बोलणार नाही. जा.. मराठी बोलणार नाही...' असे म्हटले आहे. यावर बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की 'काही रिक्षा चालकाने मुजोरपणा दाखवला आहे. अशा धमक्यांना मी घाबरत नाही. कायद्यात राहून कारवाई करणार. तर मग्रुरी आणि मुजोरीला आम्ही कायद्याच्या कक्षेत राहून उत्तर देवू असेही ते म्हणाले.

### मराठी अस्मिता टिकवणे गरजेच

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, आतापर्यंत १ लाख ६५ हजार अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी मराठी शिकण्याचे प्रशिक्षण घेतले. १९८९ च्या नियमानुसार मराठी अनिवार्य आहे. मुंबई सर्वांना कुशीत घेवून पुढे जाते. उद्यापासून (२० ऑगस्ट) कारवाईला सुरूवात करू. रोजगार बुडावा ही आमची अपेक्षा नाही, परंतु मराठी अस्मिता टिकवणे गरजेचे आहे. काहींनी व्हिडिओ प्रकाशित करून मराठी बोलणार नसल्याची मग्रुरी केली, कायद्यानुसार आता त्यांच्यावर कारवाई करू.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ श्रावण शके संवत्- १९४८
संवत्सर - पराभवनाम अयन- दक्षिणायण मास- श्रावण
ऋतु - सौर वर्षा शुक्ल पक्ष तिथि : अष्टमी २१:१८:३९
नक्षत्र : विशाखा ०९:०७:५२ योग:ऐन्द्र २८:२४:३८+
करण : विष्टि ०८:१६:०५ करण : बव २१:१८:३९ सूर्य : सिंह
चन्द्र : वृश्चिक०२:२९:५४ हिजरी सन् - १४४८ मुस्लिम मास - रबिलावल तारीख - ६ विशेष दुर्गाष्टमी दर्वाष्टमी बृहस्पती पूजन
खोरदाद साल

## राशी भविष्य...

**मेष** – जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**वृषभ** – आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**मिथून** – लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**कर्क** – उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**सिंह** – कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे.

**कन्या** – व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**तूळ** – कुटुंबात धार्मिक, शुभ कार्याची योजना आखली जाईल. आपल्या व्यवहार चातुर्याचे कौतुक होईल. व्यापारात प्रगती होईल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**वृश्चिक** – सामाजिक कामात सहभाग घ्याल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार नोकरीत आपले वर्चस्व वाढेल. अनावश्यक वाद विवाद टाळा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**धनू** – आपली अनावश्यक खर्च करण्याच्या प्रवृत्तीमुळे अडचण निर्माण होईल. व्यवसायिक समस्या निर्माण होतील. वेळेवर कामे पूर्ण न झाल्यामुळे तणावग्रस्त रहाल.

**मकर** – मनमिळावू स्वभाव असल्या कारणामुळे अडकून पडलेली कामे पूर्ण होतील. नोकरीमध्ये मान सन्मान वाढेल. कौटुंबिक समस्याकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ** – आपल्या बौध्दीक क्षमतेवर अडचणी पार पडतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. धार्मिक कामासाठी पैसा खर्च होईल. जीवनसाथीचे सहकार्य मिळेल.

**मीन** – राजकीय व्यक्तिंकडून फायदा मिळेल. आपले विरोधक आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतील. वैचारिक असंतोष राहील. कौटुंबिक वाद होण्याची शक्यता आहे.

## पारावरचा फड

एकीकडं उत्तर प्रदेशसह काही राज्यांमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने सर्वत्रच साधा-सोपा ठरलेला निवडणूक फंडा म्हणून लाडक्या बहिणींना मदतीचा हात देण्याची योजना आखली जात आहे. मात्र महाराष्ट्रात निकषांच्या कात्रीतून सुमारे ९२ लाखावर लाडक्या बहिणींना आता दरमहा दिली जाणारी दीड हजार रुपयांची भाऊबीज बंद केली जाणार आहे. वास्तविक सरकार आले तर २ हजारापेक्षा अधिक ती देण्याचे आमिषही मुख्यमंत्री देवाभाऊ व माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. ते तर सोडाच, आता आहे ते देतानाही नाकीनऊ आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे लाडक्या बहिणी नाराज होणार, त्याचा फटकाही बसणार हे जरी खरे असले तरी आता किरकोळ ग्रामपंचायतींच्य निवडणुका सोडल्या तर आता लवकर कोणत्याच निवडणुका नाहीत. त्यामुळे नाराजी पत्करण्याची तयारीही केल्याचे दिसते. यासंदर्भात पारावर रंगलेली चर्चा...!

**बाबूराव :** आरं राखी पौरनीमा जवळ आलीया आन् भावा-भनीच्या नात्याचा उत्सव जोरात हुनार हाय.

**बाबूराव :** खराय तुजं, भाऊ-भनीचं नातंच तसं आपुलकीचं आसतं. तिची रक्शा करन्याचं आन् तिला खुश ठेवन्याचं भाऊ तर तेच्या भरभराटीची परारथना भन करतीया.

**पांडूनाना :** व्हय, पर राजकीय भाऊ मातुर लईच सवारथी निगाला बग.

**बाबूराव :** आता काय झालं आनी?

**पांडूनाना :** आरं देवाभाऊ आन् एकनाथभाई मोटी टिमकी बडवून भनींना आमी दीड हाजार रुपये देतुया आसं सांगत हुती. आता मातुर तेंचा हात आकडलाया.

**बाबूराव :** आरं का आकडनार न्हाय? सरकारी तिजोरीवं आन् त्यामुळं इकासकामावं बी परीनाम व्हाय लागलाया. दुसरीकडं निकषात जे बसत न्हायती तेनास्नी देनं बी गैर न्हाय का?

**पांडूनाना :** मग हे देताना ईचार केला न्हवता का?

**बाबूराव :** आरं, येवरीथिंग इज फेअर इन लव, वार आन् इलेक्शान.

**पांडूनाना :** व्हय, म्हनून तर मद्यपरदेशाची योजना महाराष्टर, बिहार आन् पच्चिम बंगालमदी बी चालली.

**बाबूराव :** आता उत्तर परदेशात बी चालवित्यात न्हवं. आन् करनाटाकत इरोदी कांग्रेसवाले बी देत्यातच की.

**पांडूनाना :** पर म्या म्हंतु म्हाराष्टरात ९२ लाक भनीस्नी ही योजना बंद केलीया. तेंच्या नाराजीचं काय?

**बाबूराव :** म्या म्हंतो, निकषात त्या बसत न्हायती तेला सरकार काय करनार? आन् नाराज झाल्याच तर तीन-चार वरसं इलेक्शान कुटं हायती. तेवाचं तेवा बगू.

**पांडूनाना :** म्हजी परत इलेक्शानची वाट बगायची का भनींनी. होऊद्या चांगबलं.

**– अमृत चौगुले**

## उपदेश कथा

### स्वार्थ

राजा वीरेंद्रसिंह एकदा शिकारीला निघाले होते. शिकार आणि घोडदौड हे त्यांच्या आवडीचे विषय होते. नेहमीप्रमाणे लवाजमा घेऊन वीरेंद्रसिंह जंगलच्या रस्त्याला लागले. गाव मागे पडले अन् जंगलाचा रस्ता सुरू झाला. राजाने पाहिलं तर समोर एक वृध्द गृहस्थ कसले तरी रोप लावत होता. राजाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'म्हातारबा, कसले रोप लावताहात?' म्हातारा म्हणाला, 'राजा, आरं मी बदामाचं झाड लावतोया.' राजा म्हणाला, 'ते खरं म्हातारबा, पण त्याचा तुम्हाला काय उपयोग? हे झाड वाढणार कधी अन् त्याला बदाम लागणार कधी? कदाचित तुम्ही तेव्हा असणारही नाही. कशाला एवढे कष्ट घेत आहात?' म्हातारा शांतपणे म्हणाला, ''ते मला कळतंया रं ! पण स्वत:च्या पोटापुरतं पाहणारा मनुष्य नीच असतो. मला फळं मिळाली नाहीत तर काय झालं? कुणाला तरी मिळतीलच ना !''

**कथा उपदेश : स्वार्थी माणूस स्वत:चाच विचार करतो.**

## दिनविशेष...

### आंतरराष्ट्रीय

१८५६ - 'कंडेन्स्ड मिल्क' तयार करण्याच्या प्रक्रियेचा शोध.

१८९७ - रोनाल्ड रॉस यांनी हिवतापाचा प्रसार 'ॲनोफिलस डासां' मार्फत होतो, हे सिध्द केले.

१९४१ - फ्रान्समधील भूमिगत चळवळ उखडून टाकण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार फ्रेंच नागरिकांना अटक केली. यातल्या ज्यूंना छळछावण्यांत पाठविण्यात आले.

१९६८ - रशियन सैन्य झेकोस्लोव्हाकियात शिरले.

१९८७ - संत लोंगोवाल यांची भर सभेत खलिस्तानवादी अतिरेक्यांकडून हत्या.

२००६ - युध्दबंदीनंतर इस्त्राइलने लेबनानवर परत एकदा मोठा हल्ला केला. या हल्ल्यात १२८७ जण ठार झाले तर ४०५४ जण जखमी झाले.


२००६ - कोलंबोत भारतीय नेमबाजांनी १० व्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत २५ मीटर पिस्तूल नेमबाजीत २ सुवर्ण जिंकले.

२००७ - पाकिस्तानी अष्टपैलू अब्दुल रज्जाकने पाकिस्तानच्या टवेंटी-२० विश्वचषक संघातून वगळल्याच्या विरोधात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधुन निवृत्त होण्याचा निर्णय घेतला.

२००७ - भारताचा रोहन बोपन्ना व त्याचा पाकिस्तानी जोडीदार ऐसाम उल हक कुरेशीने न्यूयार्कच्या ब्रांक्समधील चॅलेंजर स्पर्धा जिंकून चौथे विजतेपद पटकावले.

२००८ - माद्रिद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर थोड्याच वेळात 'स्पेन एअर' च्या विमानात स्फोट होऊन विमानातील ४५ प्रवासी ठार झाले.

### भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी



आज २० ऑगस्ट. भारताचे माजी पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे राजीव गांधी यांची जयंती. आधुनिक विचार, विज्ञान-तंत्रज्ञानावरील विश्वास आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे राजीव गांधी यांनी भारताच्या विकासाला नवी दिशा दिली. म्हणूनच त्यांना भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे प्रमुख शिल्पकार मानले जाते. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४०व्या वर्षी त्यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असूनही राजीव गांधी यांना सुरुवातीला राजकारणात विशेष रस नव्हता. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर देशासमोर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ४०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आणि राजीव गांधींच्या नेतृत्वाला अभूतपूर्व जनादेश मिळाला. पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांनी २१वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक असेल या विचाराने त्यांनी देशात संगणकीकरण आणि दूरसंचाराच्या विस्ताराला चालना दिली.

**-शाम ठाणेदार, पुणे**

## जन की बात...

### आत्महत्या हा उपाय नाहीच!

देश एकीकडे प्रगतिपथावर मार्गक्रमण करत असताना काही समस्या मात्र दिवसागणिक गंभीर स्वरूप धरण करत आहेत. देशातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण ही त्यातीलच एक अतिशय गंभीर समस्या आहे. स्वातंत्र्यदिनी नागपूर पोलीस आयुक्तालयातील अर्ज शाखेत कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर झोल यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी आत्महत्या केली तर नुकतीच पुरणमल मेहेरा या ३० वर्षीय नौदल खलाशाने आपली पत्नी आणि दोन मुलांना संपवून स्वतः आत्महत्या केली. २०20 सालात देशभरात १ लक्ष ५३ हजार ५२ जणांनी आत्महत्या केली तर २०२४ साली हीच संख्या १ लक्ष ७० हजार ७४६ पर्यंत पोहोचली. जानेवारी ते जून २०२६ या पहिल्या ६ महिन्यांत मराठवाड्यात ४६५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यात सर्वाधिक १०९ केसेस एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नोंदवल्या गेल्या. यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी ते मे २०२६ दरम्यान १०२ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. महाराष्ट्रातील एकूण आत्महत्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण ७५ ते ८० टक्के आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये १८ ते ४५ या वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण सर्वाधिक ६५% पेक्षा जास्त आहे. एका सर्वेक्षणानुसार जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात.

**– जगन घाणेकर, सांगली**

### मेटा मेटाकुटीला येणार?

बाल लैंगिक आशयाच्या जाहिरातींबाबत भारत सरकारने नुकतीच नोटीस बजावलेली असताना, आता अमेरिकेतही मेटाच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्राममुळे तरुणांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्याचा ठपका ठेवत न्यू मेक्सिको न्यायालयाने मेटावर तब्बल ५,४०० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. मार्चपासून कंपनीवर झालेल्या दंडाची एकूण रक्कम ९,०३० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मात्र, ही रक्कम मुलांच्या मानसिक आरोग्यावरील उपचारांसाठी वापरण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. खादा प्रदूषणकारी कारखाना जसा समाजाच्या आरोग्याला धोका निर्माण करतो, त्याचप्रमाणे मेटाचे प्लॅटफॉर्मही मुलांच्या आरोग्यासाठी धोका निर्माण करत असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.आता १३ वर्षांखालील मुलांचे अवैध अकाउंट शोधण्यासाठी मेटा विशेष एआय-आधारित वयोमान पडताळणी यंत्रणा विकसित करणार आहे. त्याचप्रमाणे डिजिटल व्यसन ओळखण्यासाठी शिक्षक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. न्यायालयाच्या या कडक कारवाईमुळे १८ वर्षांखालील युजर्ससाठी रात्रीच्या वेळी पुश नोटिफिकेशन्स बंद करणे आणि मासिक वापराची वेळ मर्यादित करणे यांसारखे उपाय मेटाला करणे बंधनकारक होणार आहे. या सर्वाची पूर्तता करण्यासाठी मेटा मात्र मेटाकुटीला येणार असेच दिसते.

**-दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

# इंदापूर तहसील कार्यालयासमोर 'भीम आक्रोश मोर्चा'चे धरणे आंदोलन; सहा मागण्यांसाठी आक्रमक पवित्रा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमापूजनासह विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले

■ जनप्रवास प्रतिनिधी

इंदापूर : विविध मागण्यांसाठी 'भीम आक्रोश मोर्चा, इंदापूर'च्या वतीने मंगळवार, दि. १८ ऑगस्टपासून इंदापूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अनुसरून सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

आंदोलकांनी शासनाकडे सहा प्रमुख मागण्या केल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमापूजन तसेच सर्व शासकीय कार्यालयांमध्ये त्यांची प्रतिमा लावण्याबाबत राजपत्रक काढावे आणि शासकीय कार्यक्रमांमध्ये प्रतिमा लावणे बंधनकारक करावे, अशी प्रमुख मागणी




करण्यात आली आहे. तसेच या आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या नागरिकांना निमसरकारी कारखाने, संस्था तसेच इतर शासकीय संस्थांमध्ये आरक्षणाचा संपूर्ण लाभ मिळावा, खाजगीकरण झालेल्या सरकारी संस्थांमधील आरक्षणाच्या माध्यमातून नियुक्त कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, तसेच खाजगी संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमातीच्या नागरिकांना विशेष सुविधा देण्यात याव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय सर्व खाजगी व सरकारी शिक्षण संस्थांमध्ये सरकारी अनुदानापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदानाचा लाभ मिळावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

'भीम आक्रोश' या बॅनरखाली सुरू असलेल्या या आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा 'भीम आक्रोश मोर्चा'चे सर्वेसर्वा शरद चितारे यांनी घेतला. दरम्यान, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष निवास शेळके यांच्या वतीने आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला. यावेळी आरपीआयचे शिवाजीराव मखरे, बाळासाहेब सरवदे, अमोल मिसाळ, नितीन झेंडे, राष्ट्रसेवा दलाचे राज्य संघटक गफुर सय्यद, फुले-शाहू-आंबेडकर विचार मंचाचे हनुमंत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते माऊली नाचन, गोरख तिखुटे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे स्टँडवरून तरुणाला जबरदस्तीने नेऊन मारहाण; फोनपेवरून ७,१०० रुपये लंपास

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : पुणे बसस्थानक परिसरातून एका एसटी कर्मचाऱ्याला तीन अनोळखी तरुणांनी मोपेडवर जबरदस्तीने बसवून बुरुडगाव रोड परिसरातील मोकळ्या जागेत नेले. तेथे त्याला लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण करून मोबाईलचा पासवर्ड घेण्यात आला. त्यानंतर फोनपेच्या माध्यमातून ७ हजार १०० रुपये परस्पर खात्यावर वर्ग करून घेतल्याची धक्कादायक घटना १५ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात तीन अनोळखी तरुणांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

संग्राम गोपाळकृष्ण झेंडे (वय ३३, रा. चिखली, ता. श्रीगोंदा) हे एसटी महामंडळाच्या शिरूर (घोडनदी) आगारात लिपिक म्हणून कार्यरत आहेत. ते दररोज अहिल्यानगर येथील पुणे बसस्थानकातून शिरूर येथे कामावर जातात. १५ ऑगस्ट रोजी कामानिमित्त गुजरातमधील सुरत येथे जाण्यासाठी ते सायंकाळी सहाच्या सुमारास चिखली येथून निघाले. सायंकाळी सातच्या सुमारास ते अहिल्यानगरच्या पुणे बसस्थानकावर आले होते.

यावेळी मोबाईलवर बोलत असताना सुमारे २२ ते २३ वयोगटातील तीन अनोळखी तरुण काळ्या रंगाच्या मोपेडवरून त्यांच्याजवळ आले. 'आम्ही तुम्हाला ट्रॅव्हल्सजवळ सोडतो,' असे सांगून त्यांनी झेंडे यांना सोबत येण्यास सांगितले. त्यांनी नकार दिल्यानंतरही तिघांनी त्यांना जबरदस्तीने मोपेडवर बसवून बुरुडगाव रोड परिसरात नेले.

मोकळ्या जागेत नेल्यानंतर आरोपींनी झेंडे यांचा सॅमसंग ए-१७ मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. मोबाईलचा पासवर्ड विचारून घेतल्यानंतर फोनपेच्या माध्यमातून त्यांच्या खात्यातून ७ हजार १०० रुपये 'श्री गणेश मोबाईल अँड ॲक्सेसरीज' या खात्यावर ऑनलाइन वर्ग केल्याचे बँक स्टेटमेंटवरून समोर आले.

पैसे वर्ग केल्यानंतर आरोपींनी झेंडे यांना शिवीगाळ व दमदाटी करून लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यातील एका आरोपीने मोठा दगड हातात घेऊन 'आज तुला जिवंतच मारून टाकतो,' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर आरोपी झेंडे यांना तेथेच सोडून पसार झाले.

घाबरलेल्या अवस्थेत झेंडे यांनी रस्त्यावर येऊन नातेवाईकांशी संपर्क साधला आणि पुणे बसस्थानक गाठले. त्यानंतर ते चिखली येथे घरी गेले. बँक स्टेटमेंट तपासल्यानंतर फोनपेच्या माध्यमातून ७ हजार १०० रुपये बळजबरीने वर्ग केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी तीन अनोळखी तरुणांविरुद्ध जबरदस्तीने नेणे, मारहाण, धमकी देणे, मोबाईल व पैसे बळजबरीने घेणे आदी प्रकाराबाबत तक्रार दाखल झाली असून, कोतवाली पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

# निमगाव केतकीत नागपंचमी उत्साहात; पारंपरिक वाद्यांसह निघाली नागोबाची दिंडी; नाभिक समाजाकडे अनेक वर्षांपासून असलेला मान यंदाही जपला

■ जनप्रवास प्रतिनिधी

इंदापूर : नागपंचमीच्या पवित्र पर्वानिमित्त इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथे नागोबाची पारंपरिक मिरवणूक भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. ग्रामदैवत श्री केतकेश्वर महाराज मंदिर तसेच संत सेना महाराज व नागोबा मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता.

गावातील प्रथेनुसार मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ग्रामदैवत श्री केतकेश्वर महाराज मंदिरातील नागोबाची दगडी मूर्ती आणून संत सेना महाराज व नागोबा मंदिरात विधिवत प्रतिष्ठापित करण्यात आली. दिवसभर पंचक्रोशीतील महिला व भाविकांनी नागोबाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली.




सायंकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात नागोबाची दिंडी व मिरवणूक गावातून काढण्यात आली. ढोल-ताशांच्या तालावर तसेच 'नागोबाचा विजय असो'च्या जयघोषाने संपूर्ण गाव भक्तिमय झाले. मिरवणुकीनंतर नागोबाची मूर्ती पुन्हा श्री केतकेश्वर महाराज मंदिरात नेऊन ठेवण्यात आली.

निमगाव केतकी येथे नागपंचमीच्या मिरवणुकीची ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असून, मिरवणुकीचा मान पारंपरिकरित्या नाभिक समाजाकडे आहे. यंदाही नाभिक समाजाने हा मान श्रद्धा आणि उत्साहाने जपत धार्मिक परंपरेचे जतन केले.

या सोहळ्यास पंचायत समिती सदस्य श्रीराज भरणे, माजी उपसभापती देवराज जाधव यांच्यासह परिसरातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये सुवर्णयुग पतसंस्थेचे अध्यक्ष दशरथ डोंगरे, बालाजी पतसंस्थेचे अध्यक्ष तात्यासाहेब वडापुरे, गजराज पतसंस्थेचे अध्यक्ष संदीप भोंग, विशाल विजय जगताप, बजरंग जगताप यांचा समावेश होता.

यावेळी दत्तात्रय चांदणे, विष्णुपंत जगताप, ग्रामपंचायत अधिकारी लक्ष्मीकांत जगताप, संतोष जगताप, तात्यासाहेब जगताप, गणेश जगताप, संतोष हनुमंत जगताप, दादाराम जगताप, औदुंबर जगताप यांच्यासह नाभिक समाज बांधव आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविणाऱ्या या नागोबा दिंडीमुळे निमगाव केतकी येथे नागपंचमीचा सण यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा झाला.

# भीमा-पाटस सहकारी साखर कारखाना निवडणूक प्रक्रिया सुरू; प्रारूप मतदार यादी जाहीर, आक्षेप नोंदवण्याचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : भीमा-पाटस सहकारी साखर कारखानाच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या दृष्टीने हालचालींना वेग आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार निवडणुकीची अधिकृत प्रक्रिया सुरू करण्यात आली असून जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) डॉ. प्रविण बागुल यांनी प्रारूप मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

दुसऱ्या बाजूला, सत्वशील शितोळे आणि वसंत साळुंखे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निवडणूक निधीसाठी रु.




४०,१२,०००/- चा चेक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (शाखा पाटस) द्वारे प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग यांच्याकडे सुपूर्द करून निवडणूक प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याची विनंती केली आहे.

मतदार यादी प्रसिद्धी व अंतिम टप्प्यांचे वेळापत्रक :

प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी: १९ ऑगस्ट २०२६ (सकाळी ११:०० वाजता)

हरकती व आक्षेप दाखल करणे: १९ ऑगस्ट २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६

आक्षेपांवर निर्णय घेणे: ०७ सप्टेंबर २०२६ पर्यंत

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे: ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत

प्रारूप यादी पाहण्याचे व हरकती नोंदवण्याचे ठिकाण प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, भीमा सहकारी साखर कारखाना (पाटस), सहाय्यक निबंधक (दौंड व बारामती) तसेच तहसीलदार कार्यालय (दौंड) येथे उपलब्ध राहील.

नागरिकांना किंवा सभासदांना या मतदार यादीवर काही हरकत किंवा आक्षेप घ्यायचा असल्यास, तो २८ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग (पहिला मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे) यांच्याकडे प्रत्यक्ष किंवा ।क्षर्वाीपिश.शश्रशलींळेपसारळश्र.लो या ईमेलवर दाखल करता येईल.

# कर्जत व जामखेडमधील उपजिल्हा रुग्णालये कार्यान्वित करा : आ. रोहित पवार

■ जनप्रवास प्रतिनिधी

कर्जत : कर्जत आणि जामखेड या दोन्ही ठिकाणच्या उपजिल्हा रुग्णालयांची कामे अंतिम टप्प्यात आली असून इथे मंजूर केलेली पदे तातडीने भरावीत आणि या उपजिल्हा रुग्णालयांचे लोकार्पण करावे, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली. तसेच मिरजगाव येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी वाढीव निधी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याची मागणीही त्यांनी केली.

आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या आमदारकीच्या पहिल्या टर्ममध्ये कर्जत येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे तर जामखेड



येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून तेथेही १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास मंजुरी आणली आणि त्यासाठी भरीव निधीही आणला. सध्या या दोन्हीही उपजिल्हा रुग्णालयांची कामे जवळपास पूर्णत्त्वास गेली आहेत. तसेच मिरजगाव येथेही ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करुन आणले आणि याचेही काम जवळपास ७५ टक्के पूर्ण झाले आहे. कर्जत आणि जामखेड येथील उपजिल्हा रुग्णालयांसाठी आमदार रोहित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा करुन जून २०२६ मध्ये आवश्यक वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, तांत्रिक कर्मचारी तसेच इतर आवश्यक पदे मंजूर करून आणली आणि याबाबतचा शासन निर्णय (जीआर) काढण्यात आला आहे. काल त्यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन याबाबत त्यांचे आभार मानले. या दोन्ही ठिकाणी मंजूर झालेल्या पदांची अद्याप भरती झालेली नाही, ती भरती करुन दोन्ही उपजिल्हा रुग्णालये नागरिकांच्या सेवेत लवकरात लवकर कार्यान्वित करावीत, अशी मागणी यावेळी आमदार रोहित पवार यांनी मंत्री आबिटकर यांच्याकडे केली.

दरम्यान, मिरजगाव येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ कोटी रुपयांच्या वाढीव निधीची आवश्यकता असल्याचेही रोहित पवार यांनी आरोग्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. हा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, तसेच मिरजगाव उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचा प्रस्ताव मंजूर करून त्यासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

कर्जत, जामखेड आणि मिरजगाव या तीनही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालये उभी करण्यामागचा उद्देश केवळ इमारती बांधणे नसून, मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे रुग्णालयांच्या उभारणीपासून निधी, मनुष्यबळ आणि आवश्यक सुविधांपर्यंत प्रत्येक बाबीचा पाठपुरावा करून ही आरोग्य केंद्रे पूर्ण क्षमतेने नागरिकांच्या सेवेत आणण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

# दोस्तीकॉन २०२६ राष्ट्रीय डायबेसिटी परिषद नागपुरमध्ये देशभरातील तज्ज्ञ एकत्र येणार

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : मधुमेह, लठ्ठपणा आणि त्यातून होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचे प्रमाण वाढत असताना दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह) तर्फे दोस्तीकॉन २०२६ - राष्ट्रीय डायबेसिटी परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. ही परिषद २२ आणि २३ ऑगस्ट २०२६ रोजी हॉटेल रेजेंटा सेंट्रल, जगनाडे चौक, नागपूर येथे होणार आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदची थीम गुडबाय डायबेसिटी, गुडबाय डायबेटिक फूट म्हणजेच डायबेसिटीला निरोप, डायबेटिक फूटला निरोप अशी आहे. देशभरातील डॉक्टर, वैद्यकीय तज्ज्ञ आणि राष्ट्रीय



स्तरावरील तज्ज्ञ या परिषदेत सहभागी होणार आहेत. मधुमेह, लठ्ठपणा, डायबेटिक फूट (मधुमेहामुळे पायांवर होणाऱ्या गंभीर समस्या) आणि चयापचयाशी संबंधित आरोग्य समस्यांवरील आधुनिक उपचार पद्धती आणि नवीन माहितीवर यावेळी चर्चा होणार आहे.

या परिषदेचे आयोजन दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव) यांच्या वतीने करण्यात येत आहे. या आयोजनाला इंडियन मेडिकल असोसिएशन, असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया , इंडियन पोडियाट्री असोसिएशन, अजमेरू डायबिटीज सोसायटी आणि डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया यांचे सहकार्य लाभले आहे. यासोबतच इंटरनॅशनल डायबिटीज एक्सपर्ट्स कन्सोर्टियम (खऊएउ), पुणे हे देखील या आयोजनाला सहकार्य करत आहे. आयोजन समितीमध्ये डॉ. अजय कडूसकर, आयोजन सह-अध्यक्ष, दोस्तीकॉन २०२६; डॉ. अभिषेक पांडे, आयोजन सह-अध्यक्ष; आणि डॉ. केदार देशपांडे, आयोजन सचिव, दोस्तीकॉन २०२६ यांचा समावेश आहे.

# दौंडच्या पत्रकारांना धमकावणाऱ्या पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या निलंबनाची मागणी

## थेट कोल्हापूर गाठून विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्याकडे मांडली कैफियत

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवर दादागिरी करत त्यांना थेट धमकावण्याचा धक्कादायक प्रकार दौंड पोलीस ठाण्यात घडला आहे. पत्रकार परिषदेत, पोलीस ठाण्यातील प्रशासकीय अनागोंदी, प्रलंबित गुन्हे आणि अवैध धंद्यांवर प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना थेट आमच्याकडे तुमची कुंडली आहे, काड्या करू नका अशी खुली धमकी पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली. यामुळे संपूर्ण दौंड तालुक्यातील पत्रकार कमालीचे आक्रमक झाले असून, पत्रकारांना धमकावणाऱ्या पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या मनमानी कारभाराविरोधात थेट कोल्हापूर गाठून विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्याकडे कैफियत मांडली आहे. गुरुवार, दि. १३ ऑगस्ट



रोजी पोलीस ठाण्यात रोहित्र चोरी प्रकरणाची माहिती देण्यासाठी पोलीस प्रशासनाकडूनच पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. दुपारी ०१ वाजताची वेळ देऊनही पाऊण तास पत्रकारांना बसवून ठेवण्यात आले. ना प्रेसनोट तयार होती, ना आरोपींना हजर केले होते. या विलंबाबाबत आणि तालुक्यातील विवेक गटणे आत्महत्या प्रकरण व तरुणीच्या अपहरणासारख्या गंभीर गुन्ह्यांतील संशयास्पद तपासावर एक ज्येष्ठ पत्रकार आणि सहकाऱ्यांनी प्रश्न विचारले.

प्रश्नांची उत्तरे देऊन पारदर्शकता दाखवण्याऐवजी पोलीस निरीक्षक शेडगे यांचा ताबा सुटला. तुम्हाला उत्तरे माहीत आहेत तर प्रश्न का विचारता? असे उद्दाम उत्तर देत त्यांनी पत्रकारांना उघडपणे धमकावले. इथल्या प्रत्येकाची आमच्याकडे माहिती आहे, उगाच काड्या करू नका अशी मुजोर भाषा वापरत पत्रकारांना गप्प करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या या हुकूमशाही वृत्तीचा निषेध करत सर्व पत्रकारांनी बैठकीवर बहिष्कार टाकला. पोलिसांच्या 'अ'कार्यक्षमतेवर प्रश्न विचारल्यामुळे चिडलेल्या पोलीस निरीक्षकाची तक्रार घेऊन दौंडचे पत्रकार एकजुटीने कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्या दरबारी पोहोचले. दौंडवरून थेट कोल्हापूरपर्यंत पत्रकारांनी मारलेली धडक ही खाकीच्या दडपशाहीविरोधात उठलेला मोठा एल्गार ठरली आहे.

> ● पोलीस प्रशासन स्वत:चे अपयश लपवण्यासाठी पत्रकारांचा आवाज दाबू शकत नाही. ही लढाई केवळ एका पत्रकार परिषदेपुरती मर्यादित नसून वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या रक्षणाची आहे. जर येत्या काही दिवसांत संबंधित अधिकाऱ्यावर कडक कारवाई झाली नाही, तर या संदर्भात तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> – सकल पत्रकार वर्ग, दौंड तालुका

> ● विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांनी पत्रकारांचे म्हणणे अत्यंत गांभीर्याने ऐकून घेतले. दौंडवरून सर्व पत्रकार थेट कोल्हापूरपर्यंत येतात, याचा अर्थ विषय नक्कीच गंभीर आहे, अशी कबुली देत त्यांनी या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून तात्काळ कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तसेच, पत्रकार आणि पोलीस प्रशासनात सुसंवाद व विश्वासाचे नाते असायला हवे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

दौंड तालुक्यातील सर्व पत्रकारांनी एकत्र येत पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांची निष्पक्ष चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई करावी, घटनेच्या दिवशीचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज, स्टेशन डायरी आणि ऑडिओ-व्हिडिओ पुरावे ताब्यात घेऊन तपासात समाविष्ट करावेत, बीट अंमलदारांचे संगनमत, हद्दपारीतील पक्षपात आणि बनावट नोटा प्रकरणाची आरबीआय आणि गृह मंत्रालयामार्फत सखोल चौकशी व्हावी, ठाणे अंमलदारांना पत्रकारांना माहिती न देण्याचे दिलेले बेकायदेशीर तोंडी आदेश तात्काळ रद्द करावेत अशी लेखी तक्रार दाखल केली आहे. पत्रकारांनी सादर केलेल्या निवेदनात केवळ निरीक्षकांच्या वर्तनाचीच नव्हे, तर दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या मटका, दारू आणि जुगाराच्या अड्ड्यांची, तसेच गंभीर गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई न करण्याच्या संशयास्पद कारभाराचीही पोलखोल केली आहे. आयजींच्या आश्वासनानंतर आता पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्यावर काय कारवाई होते आणि दौंडमधील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन होणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. पत्रकारांवरील दडपशाही खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा या आंदोलनातून देण्यात आला आहे.

# श्रावण महिन्याचे औचित्य साधत पीएनजी ज्वेलर्सकडून पारंपरिक 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा

■ जनप्रवास प्रतिनिधी

बारामती : भारतीय वैवाहिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा केली आहे. हा महोत्सव १३ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भारतातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूममध्ये सुरू असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय महिलांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, परंपरेचा वारसा जपत विविध शैलींतील मंगळसूत्रांचा सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि आकर्षक संग्रह ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून 'मंगळसूत्र महोत्सव' हा पीएनजी ज्वेलर्सचा एक वैशिष्ट्यपूर्ण वार्षिक उपक्रम म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात पारंपरिक, आधुनिक तसेच हलक्या वजनाच्या मंगळसूत्रांचा विस्तृत संग्रह उपलब्ध असून, सणासुदीच्या प्रसंगांपासून ते दैनंदिन वापरापर्यंत प्रत्येक गरज पूर्ण करणाऱ्या विविध डिझाइन्स ग्राहकांना पाहायला मिळतील. यंदाच्या संग्रहात आकर्षक सोन्याची मंगळसूत्रे, सॉलिटेअर-प्रेरित डायमंड मंगळसूत्रे, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त मिनिमलिस्ट डिझाइन्स तसेच व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देणाऱ्या आधुनिक शैलीतील मंगळसूत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

सर्व वयोगटातील विवाहित महिलांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन साकारण्यात आलेला हा संग्रह, श्रावण महिन्याच्या निमित्ताने पत्नी, सून किंवा कुटुंबातील महिलांना अर्थपूर्ण भेट देऊ इच्छिणाऱ्या पती आणि कुटुंबीयांसाठीही एक उत्तम पर्याय ठरणार आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि परवडणाऱ्या किमतीचा समतोल साधत, विविध शैली, आवडीनिवडी आणि बजेटनुसार मंगळसूत्रांची निवड करण्याची संधी या महोत्सवातून ग्राहकांना मिळणार आहे. या महोत्सवादरम्यान ग्राहकांना मंगळसूत्रांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेस केवळ ७.९९% पासून उपलब्ध असतील. ही विशेष ऑफर १३ सप्टेंबर २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असेल. त्यामुळे परंपरा, प्रेम आणि वैवाहिक बंधाचे प्रतीक असलेले मंगळसूत्र आकर्षक ऑफर्ससह खरेदी करण्याची ही सुवर्णसंधी आहे.

## संक्षिप्त



### नवनियुक्त शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांचे क्रांतिकारी शिक्षण संघटनेतर्फे स्वागत

■ जनप्रवास प्रतिनिधी

नागपूर : नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या नवनियुक्त शिक्षणाधिकारीपदी मा. श्री. अमित भदाणे यांची नियुक्ती झाल्यानंतर क्रांतिकारी शिक्षण संघटना, नागपूर जिल्हा यांच्या वतीने त्यांची सदिच्छा भेट घेऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा भेटीदरम्यान संघटनेचे अध्यक्ष मा. आरिफ पठाण, उपाध्यक्ष मा. जावेद कमानवाले, सचिव मा. प्रतीक सुखदेवे तसेच सहसचिव मा. इम्तियाज खान उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांच्याशी नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या विविध शैक्षणिक बाबींवर तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित विषयांवर सकारात्मक चर्चा केली. नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध व्हावे आणि शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्नांना प्रभावीपणे हाताळले जावे, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. शिक्षकांच्या समस्या, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी प्रशासन व शिक्षक संघटना यांच्यात सकारात्मक समन्वय आवश्यक आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. नवनियुक्त शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या कार्याला अधिक गती मिळेल आणि शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येतील, असा विश्वास संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला. नवीन जबाबदारी स्वीकारणाऱ्या शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी क्रांतिकारी शिक्षण संघटना, नागपूर जिल्हा यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षक हित, विद्यार्थी हित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संघटना यापुढेही संघटितपणे कार्यरत राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.



### रोहित पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; विविध मान्यवरांकडून अभिनंदन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणतांबा : राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार) पक्षाच्या पहिल्या नगर जिल्हा सरचिटणीस पदी येथील बाळासाहेब चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी त्यांना नियुक्तीचे दिलेले पत्र आमदार रोहित पवार यांनी त्यांना देऊन सन्मानित केले, चव्हाण हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रिय व निष्ठावान कार्यकर्ते म्हणून जिल्ह्यात ओळखले जातात त्यांनी राष्ट्रवादीचे राहता तालुकाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळलेली आहे, पुणतांबा येथे झालेला ऐतिहासिक शेतकरी संप यासह अनेक चळवळीमध्ये त्यांनी सहभाग घेऊन नेतृत्व केलेले आहे, चव्हाण यांच्या निवडीबद्दल प्रदेशाध्यक्ष शिंदे प्रदेश उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर खासदार सुप्रिया सुळे, आमदार जयंत पाटील, उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे ,रावसाहेब मस्के आदींनी अभिनंदन केले आहे



### कांदा चाळीत युरिया टाकल्याने ५० हून अधिक पिशवी कांदा सडला; पारगावातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील बढेकर मळ्यात कांदा चाळीत अज्ञात व्यक्तीने युरिया टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. युरियामुळे शेतकरी अर्जुन सोनबा बढेकर यांच्या चाळीतील ५० हून अधिक पिशवी कांदा सडून खराब झाला असून, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अर्जुन बढेकर यांनी यंदा सुमारे ४५० पिशवी कांदा चाळीत साठवून ठेवला होता. त्यापैकी ३०० पिशवी कांदा विकल्यानंतर उर्वरित सुमारे १५० पिशवी कांदा चांगला बाजारभाव मिळण्याच्या प्रतीक्षेत चाळीत ठेवण्यात आला होता. मात्र, सोमवार दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी कांदा विक्रीसाठी चाळीतून काढत असताना वरच्या बाजूचा सुमारे एक फूट कांदा सडलेला आढळून आला. त्यानंतर चाळीची पाहणी केली असता अज्ञात व्यक्तीने सुमारे आठवड्यापूर्वी चाळीत युरिया टाकल्याचे निदर्शनास आले. युरिया टाकल्यामुळे चाळीतील ५० हून अधिक पिशवी कांदा खराब झाल्याचा अंदाज असून, त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने साठवून ठेवलेल्या कांद्याचे नुकसान झाल्याने शेतकरी अर्जुन बढेकर यांनी संताप व्यक्त केला आहे. या घटनेची माहिती पारगाव कारखाना पोलिसांना देण्यात आली असून, अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन संबंधितावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी अर्जुन बढेकर यांनी केली आहे. या प्रकारामुळे परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्येही संतापाचे वातावरण निर्माण झाले.



### लेफ्टनंट कर्नल' ते 'जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. नागरे यांचा प्रेरणादायी प्रवास

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी वर्ग–१ या पदावर निवड झाल्याबद्दल लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्जेराव नागरे यांचा 'स्नेहबंध सोशल फौंडेशन'तर्फे सन्मानपत्र व शाल देऊन गौरव करण्यात आला. स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते डॉ. नागरे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी मारुतीराव मिसळवालेचे संचालक अमित खामकर, प्रसिद्ध बांधकाम व्यवसाईक कुशल घुले, डॉ. अर्चना नागरे, वैष्णव नागरे, अर्णव नागरे आदी उपस्थित होते. डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्जेराव नागरे यांची एमपीएससीमार्फत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी या वर्ग–१ पदावर झालेली निवड ही अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. सैन्यसेवेनंतर प्रशासकीय क्षेत्रातही देशसेवा आणि समाजसेवेची संधी त्यांना मिळाली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा लाभ होईल. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

# आरोग्याची वेळेवर तपासणी व योग्य उपचार गरजेचे : आ. आशुतोष काळे

## माजी आमदार अशोकराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत कान–नाक–घसा तपासणी शिबिर संपन्न

■जनप्रवास विशेष प्रतिनिधी

कोळपेवाडी : कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार अशोकराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व गर्जे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कान, नाक व घसा संबंधित आजारांच्या रुग्णांसाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिराचे उद्घाटन आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते बुधवार (दि.१९) रोजी सकाळी १० वा. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कर्मवीर शंकरराव काळे सहकार सभागृहात पार पडले. यावेळी ते म्हणाले की, कान, नाक आणि घसा हे शरीराचे अत्यंत महत्त्वाचे अवयव असून दैनंदिन जीवनातील अनेक संवेदनशील क्रियांशी त्यांचा थेट संबंध आहे. त्यामुळे या अवयवांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. किरकोळ त्रास वाटत असला तरी तो वारंवार होत असल्यास वेळेत तपासणी करून घेणे आवश्यक आहे. योग्य वेळी आजारांचे निदान आणि उपचार झाल्यास गंभीर स्वरूपाच्या आरोग्य समस्या टाळता येऊ शकतात.



माजी आमदार अशोकराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्यासाठी मोफत कान, नाक, घसा तपासणी शिबिराचे केलेले आयोजन कौतुकास्पद बाब आहे. गरजू नागरिकांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी या उद्देशाने अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देणे आवश्यक असून नागरिकांनी आपल्या आरोग्याची नियमित काळजी घेऊन कान, नाक व घसा आणि इतर आजारांच्या बाबतीतही जागरूक राहावे जेणेकरून मोठ्या आजाराचा आणि आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार नाही. यामुळे नागरिकांनी वेळोवेळी आरोग्य तपासण्या कराव्या आणि शरीराची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. या शिबिराच्या माध्यमातून अनेक नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी तसेच उपयुक्त वैद्यकीय सल्ला मिळाल्याने रुग्णांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

यावेळी कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. पूजा वरद गर्जे व त्यांच्या सहकार्यांच्या माध्यमातून कान, नाक व घसा संबंधित विविध आजारांची तपासणी करून त्यांना वैद्यकीय मार्गदर्शन केले. या शिबीराचा परिसरातील नागरिक, महिला, विद्यार्थी, कामगार, आणि ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला. यावेळी शिबिराचे आयोजन केल्याबद्दल लाभधारकांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले.

यावेळी डॉ. अजय गर्जे, डॉ. वरद गर्जे, डॉ. नकुल गर्जे, डॉ. दिनेश पानगव्हाणे, डॉ. दत्तात्रय कोळपे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, प्रशांत घुले, विष्णुआबा शिंदे, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बी.बी. सय्यद, असिस्टंट सेक्रेटरी संदिप शिरसाठ, कारखाना आरोग्य अधिकारी डॉ. शैलेश जैन, मुख्य लेखा अधिकारी वैभव काळे, चिफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चीफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे, कामगार अधिकारी दिपक निंबाळकर, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे यांच्यासह विविध खात्यांचे प्रमुख पदाधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## मिशन आपुलकी अंतर्गत ममदापूर जि.प.प्रा.उर्दू शाळेत मोफत दप्तर वाटप कार्यक्रम संपन्न



■जनप्रवास प्रतिनिधी

ममदापूर : राहाता तालुक्यातील ममदापूर येथे जि.प.प्रा.उर्दू शाळेत मोफत दप्तर वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कुराण वाचनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून हाजी मुस्ताक भाई निवड करण्यात आली तर प्रमुख पाहुणे पत्रकार राजमोहंमद करीम शेख (इंजिनियर) व पत्रकार सलीम शेख हे होते. मुलांनी देश भक्ती गीत गाऊन व देश भक्ती पर भाषणे करत सर्वांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन हाजी जावेद सर यांनी केले राजमोहंमद शेख यांनी मनोगत व्यक्त करताना मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. परवीन बाजी यांनी ही आपल्या भाषणात विशेष सूचना मांडल्या.

पत्रकार राजमोहंमद करीम शेख (इंजिनियर) यांचे प्रयत्नाने श्रीमती प्रभावती शंकर देशपांडे मॅडम (रिटायर्ड प्राथमिक शिक्षिका) यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वितरण करण्यात आले. त्यांचे मनःपूर्वक आभार शाळेचे मुख्याध्यापकमोहंमद बदर सर यांनी मानले. याप्रसंगी जि.प.प्रा.उर्दू शाळा व्यवस्थापन समिती ममदापूर चे शिक्षण प्रेमी हाजी मुस्ताक भाई हे हजर होते तसेच मुख्याध्यापक मोहम्मद बदर सर, हाजी जावेद सर, हिसामुद्दीन सर, परवीन बाजी, हुसना बाजी व विद्यार्थी मोठ्या संख्येत हजर होते. शेवटी आभार मुख्याध्यापक मोहम्मद बदर सर यांनी मानले व कार्यक्रम खेळी मेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

## मुकुंदनगरातील अनधिकृत 'नूर लॉन्स'वर महापालिकेचा दणका

### रहिवासी भागातील अनधिकृत वापरामुळे नागरिक त्रस्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : मुकुंदनगर येथे महानगरपालिकेचे कर्मचारी धीरज परदेशी यांच्या हत्येच्या घटनेनंतर परिसरातील कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले असून, सकल हिंदू समाजाच्या वतीनेही घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. प्रशासनाने परिस्थिती संयमाने हाताळत प्रकरण नियंत्रणात आणले. मात्र, ही घटना शांत होत नाही तोच मुकुंदनगर परिसरातील अनधिकृत लॉन्सचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सहारा सिटी येथील सर्व्हे क्रमांक ३३३/१/२ व ३३४/१/२ या ठिकाणी कन्व्हेन्शनल सेंटरसाठी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या जागेचा 'नूर लॉन्स' म्हणून अनधिकृत वापर केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे.

रहिवासी भागात मोठ्या प्रमाणावर विवाह व इतर समारंभ आयोजित होत असल्याने परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडी, पार्किंग, मोठा आवाज तसेच अन्य समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे या अनधिकृत वापराविरोधात नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.

## मराठा महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; कारवाईची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : मराठा समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करत नवनाथ वाघमारे यांच्याविरोधात अखंड मराठा समाज व संभाजी ब्रिगेड, श्रीगोंदा तालुका यांच्या वतीने श्रीगोंदा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तीने सार्वजनिकरित्या तसेच प्रसारमाध्यमांतून मराठा समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचे नमूद करण्यात आले आहे. या वक्तव्यामुळे समाजातील महिला व नागरिकांच्या भावना दुखावल्या असून, त्यातून गैरसमज, वैमनस्य आणि सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.



या प्रकरणातील संबंधित व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग, सोशल मीडिया पोस्ट तसेच प्रसारित झालेल्या माध्यमांची सखोल चौकशी करून त्यांची सत्यता पडताळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित वक्तव्याची कायदेशीर तपासणी करून भारतीय न्याय संहिता (इछड) व इतर लागू कायद्यांतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करावा आणि कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी अखंड मराठा समाज व संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.

महिलांचा सन्मान आणि सामाजिक सलोखा अबाधित ठेवणे आवश्यक असून, कोणत्याही समाजातील महिला किंवा नागरिकांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करून सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या प्रकरणाची पोलिस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आनंद औटी, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिलीप लबडे, अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख शामभाऊ जरे, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र नागवडे, आनंद लगड, कचरू वागसकर यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## दरोड्याचा गुन्हा चौथ्या दिवशी उघड; सहा आरोपी जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : गडदे आखाडा शिवारातील राहुरी–मल्हारवाडी रस्त्यावर ११ ऑगस्ट रोजी रात्री झालेल्या दरोड्याचा गुन्हा राहुरी पोलिसांनी चौथ्याच दिवशी उघडकीस आणला. तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सहा आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेतले. आरोपींकडून रोख रक्कम, टॅब, दोन मोटारसायकली व चोरीस गेलेली कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

श्रीकांत संतोष पोपळघट हे ११ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे दहा वाजता गडदे आखाडा शिवारातून जात असताना पाच ते सहा इसमांनी त्यांचा पाठलाग करून मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या जवळील रोख रक्कम व टॅब हिसकावून आरोपी पसार झाले. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९०८/२०२६,



भारतीय न्याय संहिता कलम ३१०(१), ३१०(२) व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शंकर भाऊसाहेब माळी, शिवाजी लक्ष्मण बर्डे, बाबू संजय वाघ, ऋतिक दिलीप बर्डे, संतोष शांताराम बर्डे आणि दाद्या उर्फ नवनाथ भाऊसाहेब बर्डे यांना ताब्यात घेतले. आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.आरोपींकडून ८ हजार ६० रुपये रोख, सुमारे २५ हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा टॅब, दोन मोटारसायकली तसेच फिर्यादीची कागदपत्रे व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर व पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिसांच्या तपास पथकाने केली. श्रीरामपूर मोबाईल सेलच्या पोलिसांनीही तांत्रिक तपासात मदत केली. गुन्ह्यातील उर्वरित मुद्देमाल व अन्य आरोपींच्या सहभागाबाबत पुढील तपास सुरू आहे.

## चांद सुलताना शाळेच्या मुख्याध्यापकांना न्याय मिळणार का?

### विश्वस्त मंडळातील वादातून मुख्याध्यापकांशी गैरवर्तन; विद्यार्थी–पालकांमध्ये चिंता

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : ऐतिहासिक चांद सुलताना उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विश्वस्त मंडळाच्या अंतर्गत वादातून मुख्याध्यापक तथा विश्वस्त शेख मोहम्मद यांच्याशी झालेला कथित हल्ला, शिवीगाळ व धक्काबुक्कीचा प्रकार गंभीर असून, या घटनेमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुख्याध्यापक शेख मोहम्मद यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, काही व्यक्तींनी कार्यालयात घुसून त्यांना ठार मारण्याची धमकी देत शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात संबंधित संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे.

दरम्यान, संस्थेच्या व्यवस्थापनावरून दोन गटांमध्ये वाद असून, हे प्रकरण धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असताना संस्थेच्या प्रशासकीय कामकाजात बळजबरीने हस्तक्षेप करणे किंवा कायदा हातात घेणे योग्य नसल्याची भूमिका पालक व नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या प्रकरणात पोलिसांनी कोणताही दबाव न घेता निष्पक्ष तपास करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या भूमिकेकडे आता पालक व नागरिकांचे लक्ष लागले आहे. मुख्याध्यापक शेख मोहम्मद यांना या प्रकरणात न्याय मिळणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे. शाळेतील अंतर्गत वादाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर आणि शैक्षणिक वातावरणावर होऊ नये, अशी पालकांची अपेक्षा आहे.

# सर्पदंश नोंदणीला शासनाची मान्यता : पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश; हाफकिनच्या पुनरुज्जीवनासह विषबँकेसाठी पुढाकार

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : राज्यातील सर्पदंशाच्या प्रत्येक घटनेची शास्त्रशुद्ध नोंद व्हावी, सर्पदंशामुळे होणारे मृत्यू व अपंगत्व कमी व्हावे आणि रुग्णांना वेळेत योग्य उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्पदंशाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी या निर्णयाचे स्वागत करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आभार मानले. ३० जून २०२६ रोजी विधानसभेत सर्पदंशाचा मुद्दा उपस्थित करून प्रत्येक घटनेची अधिकृत नोंद करण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे यश मिळाले आहे.

आ. पाचपुते यांनी सर्पदंशाचा प्रश्न केवळ मृत्यूच्या आकडेवारीपुरता मर्यादित न ठेवता राज्यातील प्रत्येक सर्पदंशाची नोंद होणे आवश्यक असल्याचे विधानसभेत स्पष्ट केले होते. सर्पदंशाच्या वास्तविक घटना, विषबाधेचे स्वरूप, रुग्णांना देण्यात येणारे सर्पविष प्रतिबंधक औषध (प्रतिविष), उपचारानंतर उद्भवणारे दुष्परिणाम, अपंगत्व तसेच दीर्घकालीन आरोग्य परिणामांची शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध



होण्यासाठी प्रभावी नोंदणी व्यवस्था उभारण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या मागणीची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक दखल घेत कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. शासनाच्या निर्णयामुळे आता सर्पदंशाच्या संशयित, संभाव्य आणि निश्चित घटनांसह सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूंची नोंद आरोग्य यंत्रणेकडे करणे बंधनकारक होणार आहे.

या नोंदणीमुळे सर्पदंशाची तारीख व ठिकाण, विषबाधेची लक्षणे, करण्यात आलेले उपचार, देण्यात आलेल्या प्रतिविषाच्या मात्रांची संख्या, रुग्णाला अन्य रुग्णालयात हलविण्यात आले असल्यास त्याचा तपशील आणि उपचाराचा अंतिम परिणाम यांसारखी महत्त्वाची माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्पदंशाच्या घटनांचा विश्वासार्ह माहिती–संग्रह तयार होऊन कोणत्या जिल्ह्यात, तालुक्यात किंवा भागात सर्पदंशाचे प्रमाण अधिक आहे, कोणत्या कालावधीत घटना वाढतात आणि कुठे उपचार व प्रतिविषाची अधिक गरज आहे, याचे शास्त्रीय विश्लेषण करता येणार आहे. या माहितीच्या आधारे प्रतिविषाचा साठा व वितरण, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना आ. विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, सर्पदंशाला अधिसूचित आजार घोषित करणे हा महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा आहे. विधानसभेत मांडलेल्या मागणीची सकारात्मक दखल घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरी यांचे मनःपूर्वक आभार. मात्र, हे काम येथेच थांबणारे नाही. सर्पदंश प्रतिबंध, उपचार आणि संशोधनासाठी हाफकिन संस्थेचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. सर्पविषावरील प्रतिविष निर्मिती आणि संशोधनातील हाफकिनचा अनुभव पुन्हा प्रभावीपणे वापरण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार आहे. तसेच महाराष्ट्रातील विविध भौगोलिक भागांतील विषारी सापांच्या प्रजाती, त्यांच्या विषातील संभाव्य प्रादेशिक फरक आणि प्रतिविषाची परिणामकारकता यांचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी 'प्रादेशिक विषबँक' उभारण्याच्या प्रक्रियेलाही चालना देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्पदंशानंतर केवळ रुग्णाचा जीव वाचविणे नव्हे, तर उपचारानंतर उद्भवणारे दीर्घकालीन आरोग्य परिणाम, अवयवांवरील परिणाम, अपंगत्व आणि पुनर्वसन यांचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. अधिसूचित आजाराच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या माहितीचा उपयोग करून सर्पदंशग्रस्त रुग्णांचा उपचारानंतर शास्त्रशुद्ध पद्धतीने पाठपुरावा करणे आणि सर्पदंशानंतरच्या गुंतागुंती व दीर्घकालीन परिणामांवर संशोधन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याचा पाठपुरावा करणार असल्याचे आ. पाचपुते यांनी स्पष्ट केले. सर्पदंशाची केवळ नोंद करून थांबायचे नाही; या माहितीचा उपयोग प्रत्येक रुग्णाला वेळेत योग्य उपचार मिळण्यासाठी, आवश्यक प्रतिविष उपलब्ध करून देण्यासाठी आणि भविष्यात अधिक प्रभावी उपचार व संशोधनासाठी झाला पाहिजे. अधिसूचनेपासून संशोधनापर्यंत आणि संशोधनापासून प्रभावी उपचारापर्यंतची संपूर्ण व्यवस्था महाराष्ट्रात उभी करण्यासाठी माझा पाठपुरावा सुरूच राहील, असा निर्धार आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त



### नांदूर येथे स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; २ हजार लिटर हातभट्टीचे रसायन जप्त, एकावर गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत :** दौंड तालुक्यातील मौजे नांदूर गावच्या हद्दीत पवार रिसोर्टसमोरील ओढ्याच्या कडेला सुरू असलेल्या बेकायदेशीर गावठी हातभट्टीच्या दारू अड्ड्यावर पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) धडक कारवाई केली. या छाप्यात पोलिसांनी तब्बल २ हजार लिटर हातभट्टीचे कच्चे रसायन आणि दारू तयार करण्याचे साहित्यासह ७७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रणाली अमित दुला गुडदावत (वय ३०, रा. खामगाव गाडामोडी, ता. दौंड) या आरोपीविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार गुरुनाथ युवराज गायकवाड (वय ४४) यांना नांदूर येथील ओढ्याच्या कडेला बेकायदेशीररीत्या हातभट्टीची दारू गाळली जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे फिर्यादी गायकवाड आणि त्यांच्या पथकाने पंचांसह मंगळवारी (दि. १८) दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास सदर ठिकाणी अचानक छापा टाकला. या कारवाईत आरोपी अमित गुडदावत हा मानवी जीवितास धोका निर्माण होईल अशा असुरक्षित पद्धतीने, कोणताही परवाना नसताना बेकायदेशीर गावठी दारू तयार करताना रंगेहात पकडला गेला. घटनास्थळावरून पोलिसांनी ३५ रुपये प्रति लिटर दराचे ७० हजार रुपये किमतीचे एकूण २,००० लिटर कच्चे रसायन, दोन मोठे लोखंडी बॅरल, ५ हजार रुपयांची ल्युमिनियमची गोलाकार थाळी, ८०० रुपयांचा चाटू आणि १४०० रुपयांचे लाकडी सरपण असा एकूण ७७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार गुरुनाथ गायकवाड यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अमित गुडदावत याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३ आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ख), (ग), (च) नुसार यवत पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ८४८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

### अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत आयोजीत निबंध स्पर्धा

■ जनप्रवास प्रतिनिधी



**टाकळीभान :** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाचे अधिनस्त श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन च्या वतीने आयोजित अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत विद्यालयीन/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी दि. १८, १९ व २० ऑगस्ट अशा तीन दिवस विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहे. या अभियानात श्रीरामपुर शहर व परिसरातील अनेक शाळा, विद्यालय, महाविद्यालय सामील झाले आहे. अभियानानिमित्त शालेय व महाविद्यालयीन स्तरावर निबंध स्पर्धा नुकत्याच अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांचे नेतृत्वाखाली व डी. वाय. एस.पी. जयदत्त भवर यांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेचे चंद्ररूप डाकले जेन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आल्या. त्यांचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विशाल खैरे, पोलीस निरीक्षक श्रीरामपूर शहर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून मनोगत व्यक्त करताना मीनाताई जगधने यांनी नशामुक्त भारत करण्यासाठी अशा निबंध स्पर्धा अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले व निबंध स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. विशाल खैरे यांनी आपल्या मनोगतात पोलीस विभाग नशामुक्त भारत अभियानासाठी करत असलेल्या अथक परिश्रमांबद्दल माहिती दिली व तरुणाईला सकारात्मक ऊर्जा देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने निबंध स्पर्धेसाठी आलेल्या सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्वागत केले व नशा मुक्त भारत अभियानासाठी आपण सर्व भारतीय कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. यावेळी श्रीरामपूर परिसरातील ७ वी ते ९ वी गटासाठी व्यसनमुक्त कुटुंब, सुखी कुटुंब, व्यसनमुक्त भारत, निरोगी भारत, नशा मुक्त समाज काळाची गरज नशा मुक्त शाळा. सुरक्षित विद्यार्थी या विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले तर १० वी ते महाविद्यालयीन गटासाठी व्यसनास नकार, जीवनास होकार, व्यसनाचे दुष्परिणाम आणि उपाय योजना व्यसनमुक्ती समाजाची सामूहिक जबाबदारी, व्यसनमुक्त भारतासाठी माझे योगदान, व्यसनमुक्तीसाठी जनजागृतीची गरज या विषयावर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले. डी. डी. काचोळे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील साळवे यांनी सदर निबंध स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले. या निबंध स्पर्धेत एकूण ५१८ निबंध स्पर्धकांनी भाग घेतला. कार्यक्रमासाठी दीपक त्रिभुवन, गट शिक्षणाधिकारी, श्रीरामपूर, श्रीमती शितल मुगडे, पोलीस निरीक्षक, रोशन निकम, पोलीस उपनिरीक्षक, एस. के. सोमय्या शाळेच्या मुख्याध्यापिका, सोनाली पैठणे, उपप्राचार्य, डॉ. अनिकेत खत्री, विभागप्रमुख प्रा. विजय नागपुरे व प्रा. योगीराज चंद्रात्रे, प्रा. सारिका पेरणे, प्रा. मयुरी जेजुरकर, प्रा. तृप्ती कोरडे, प्रा. संतोष तांबे व तालुक्यातोल बहुसंख्य शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख, डॉ. पोर्णिमा गुजर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. संतोष घंगाळे यांनी व्यक्त केले. याच अभियाना अंतर्गत दि.२० ऑगस्ट रोजी वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तर एस. के. सोमय्या शाळेत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तर दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वा. आर.बी.एन.बी. कॉलेज मैदान येथुन जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी तसेच शाळा, विदयालय व महाविदयालय यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुणे-सोलापूर हायवेवर भीषण अपघात: अज्ञात वाहनाच्या धडकेत बार्शीच्या व्यक्तीचा मृत्यू

■ जनप्रवास प्रतिनिधी

**यवत:** पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर यवत गावच्या हद्दीत हॉटेल कामत जवळ काल (१८ ऑगस्ट) मध्यरात्री एक भीषण रस्ता अपघात झाला. या अपघातात सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील दत्तात्रय भगवान वैद्य (रा. भालगाव, ता. बार्शी) नावाच्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघात करून अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पळून गेला असून, यवत पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे मिळालेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातामध्ये अशोक लेलंड कंपनीचा १६ टायर सिमेंट बलकर ट्रक (क्रमांक चक १३ एउ ४३२९) आणि एका अज्ञात वाहनाचा समावेश आहे. अज्ञात वाहनावरील चालकाने आपले वाहन हयगयीने आणि बेदरकारपणे चालवून दत्तात्रय वैद्य यांना जोराची धडक दिली. या धडकेत गंभीर दुखापत झाल्याने दत्तात्रय वैद्य यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर जखमीला कोणतीही वैद्यकीय मदत न करता किंवा पोलिसांना अपघाताची माहिती न देता अज्ञात चालक वाहनासह घटनास्थळावरून पळून गेला. याप्रकरणी मयताचे नातेवाईक सौ. संगिता कैलास काकडे (वय ४३, व्यवसाय: शेती, रा. भांडेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून यवत पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६(१), २८१, १२५ (अ) (ब) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, १३४/१७७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक (मसपोनि) गोसावी करत आहेत. महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पळून गेलेल्या अज्ञात वाहनाचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# नालेगावच्या लाल मातीत माऊली कोकाटेची विजयी कुस्ती! पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत पटकावली मानाची कुस्ती

## हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने रंगले कुस्ती मैदान; विजयी मल्लांवर बक्षिसांचा वर्षाव

■ जनप्रवास विशेष प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील सीना नदीकाठी असलेल्या श्री वारुळाचा मारुती मंदिर परिसरात नागपंचमीनिमित्त भरलेल्या यात्रेच्या उत्साहात भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने, युवा नेते तथा नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या पुढाकारातून झालेल्या या कुस्ती मैदानात राज्यभरातील नामवंत मल्लांनी सहभाग घेत लाल मातीच्या आखाड्यात आपल्या कुस्ती कौशल्याचे दर्शन घडविले. तोडीस तोड मल्ल आमनेसामने आल्याने एकापेक्षा एक रंगतदार कुस्त्या पाहण्याची पर्वणीच कुस्तीप्रेमींना मिळाली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या कुस्ती मैदानाला प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

मुख्य कुस्तीत सोलापूरच्या माऊली कोकाटेने पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट करत विजय मिळविला. कोकाटेने केलेल्या दमदार डावाने नालेगावचा आखाडा टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. कुस्तीप्रेमींनी विजयी मल्लाचे उत्स्फूर्त स्वागत करत त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. सीना नदीकाठी असलेले श्री वारुळाचा मारुती मंदिर हे शहरातील अतिशय पुरातन व जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने या ठिकाणी मोठी यात्रा भरते. यात्रेच्या पार्श्वभूमीवर कुस्ती मैदान आयोजित करण्याची नालेगावची जुनी परंपरा आहे. शहरासह विशेषत:



नालेगाव परिसराला कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली असून, या परंपरेला पुढे नेत नवोदित मल्लांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना मोठ्या आखाड्याचा अनुभव मिळावा आणि कुस्तीची संस्कृती जपली जावी, या उद्देशाने यंदाही भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले.

आखाड्यात लहान–मोठ्या मल्लांच्या अनेक कुस्त्या रंगल्या. प्रत्येक कुस्तीमध्ये मल्लांनी आपल्या ताकदीसोबतच डावपेच, चपळाई आणि तंत्रशुद्ध कुस्तीचे प्रदर्शन केले. त्यामुळे मैदानावर उपस्थित असलेल्या प्रेक्षकांमध्ये प्रत्येक कुस्तीबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. मैदानातील सर्वाधिक आकर्षण ठरलेली एक नंबरची कुस्ती सोलापूरचा माऊली कोकाटे आणि पंढरपूरचा माऊली जमदाडे यांच्यात झाली. दोन्ही मल्लांनी सुरुवातीपासूनच सावध आणि आक्रमक खेळ करत एकमेकांचा अंदाज घेण्यास सुरुवात केली. काही वेळ डावपेचांचा खेळ रंगला. अखेर सोलापूरच्या माऊली कोकाटेने योग्य संधी साधत दमदार डाव टाकला आणि पंढरपूरच्या माऊली जमदाडेला चितपट केले.

कोकाटेच्या या विजयी डावानंतर आखाड्याभोवती उपस्थित असलेल्या हजारो कुस्तीप्रेमींनी टाळ्यांचा कडकडाट करत जल्लोष केला. विजयी मल्लाला मानाची चांदीची गदा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते देण्यात आली. या कुस्ती मैदानाच्या आयोजनात युवा नेते तथा नगरसेवक पै. महेश लोंढे यांनी विशेष भूमिका बजावली. नालेगावची कुस्ती परंपरा आणि नवोदित मल्लांना व्यासपीठ मिळावे, यासाठी त्यांनी मैदानाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. मैदान यशस्वीपणे पार पडल्यानंतर पै. महेश लोंढे यांनी उपस्थितांचे, मल्लांचे, पंचांचे तसेच आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. यापुढील काळातही कुस्ती क्षेत्राला आवश्यक ते सहकार्य करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शहरातील मल्लांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी दिले. मैदानातील विजयी मल्लांवर आयोजक आणि कुस्तीप्रेमींकडून बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. विजयी मल्लांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. उपविजयी मल्लांचाही रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. अनेक प्रेक्षकांनी विजयी मल्लांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना रोख रकमेची बक्षिसे दिली.

या मैदानासाठी राज्यभरातूनच नव्हे तर देशभरातून अनेक नामांकित मल्ल आणि वस्ताद मंडळी उपस्थित होती. कुस्ती पाहण्यासाठी परिसरातील मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. यात्रेसाठी आलेल्या महिला वर्गानेही आखाड्यातील कुस्त्यांचा आनंद घेतला. मल्लांच्या प्रत्येक डावाला आणि विजयी चितपटला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळत होती. यावेळी ज्येष्ठ पैलवान तथा वस्ताद मारुती खंडागळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. मैदानात पंच म्हणून पै. संभाजी लोंढे, उपमहाराष्ट्र केसरी पै. अनिल गुंजाळ, पै. अर्जुन (देवा) शेळके, पै. बंडू शेळके, पै. सारंग वाघ, पै. युवराज करंजुले, पै. अजय म्हस्के आणि पै. दादा पांडूळे यांनी काम पाहिले.

मैदानाचे प्रभावी सूत्रसंचालन पै. हांगेश्वर धायगुडे यांनी केले. कुस्ती मैदान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आयोजक अशोक घोडके, पै. सुनिल कदम, पै. मिलिंद जपे, बाळासाहेब भापकर, दत्ता ठाणगे, विजय शिंदे, पै. मयुर जपे, पै. आकाश घोडके, पै. ओम खंडागळे, पै. शुभम लोंढे, बबन रोहोकले, शिवाजी कदम, गणेश शेठ साळुंके तसेच हिंदुत्व प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याविरोधात सकल मराठा समाज आक्रमक; इंदापूर पोलिसांकडे कारवाईची मागणी

## कथित आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता; कायदेशीर कारवाईची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी



**इंदापूर :** प्रसारमाध्यमांमध्ये नवनाथ वाघमारे यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यांविरोधात इंदापूर तालुक्यातील सकल मराठा समाज आक्रमक झाला असून, संबंधित वक्तव्यांची चौकशी करून कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी इंदापूर पोलिसांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सकल मराठा समाज, इंदापूर तालुका यांच्या वतीने इंदापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना हे निवेदन देण्यात आले. वाघमारे यांच्या कथित वक्तव्यांमुळे मराठा व ओबीसी समाजामध्ये गैरसमज, द्वेष अथवा सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, एका जाहीर मुलाखतीदरम्यान अथवा चर्चेदरम्यान वाघमारे यांनी मराठा समाजातील मुलींबाबत तसेच ओबीसी समाजातील व्यक्तींबाबत कथित आक्षेपार्ह स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप आहे. संबंधित वक्तव्ये प्रसारमाध्यमांतून प्रसारित झाल्यानंतर समाजबांधवांमध्ये नाराजी व संतापाची भावना निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

समाजातील विविध घटकांमध्ये सलोखा कायम राहणे आवश्यक असताना, कोणत्याही व्यक्तीने आपल्या वक्तव्यांमधून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल किंवा महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचेल, अशी वक्तव्ये करू नयेत, अशी भूमिका सकल मराठा समाजाने घेतली आहे.

दरम्यान, संबंधित वक्तव्यांचे व्हिडिओ, प्रसारमाध्यमांतील सामग्री व इतर उपलब्ध पुरावे तपासून त्यांची सत्यता पडताळावी. त्यानंतर लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे.

या निवेदनावर सकल मराठा समाजातील विविध पदाधिकारी व समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे इंदापूर पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी करून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, नवनाथ वाघमारे यांची या आरोपांबाबतची भूमिका अथवा स्पष्टीकरण या निवेदनात उपलब्ध झालेले नाही. त्यांची बाजू समोर आल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## स्थानिक गुन्हे शाखेचे एकाच दिवशी ११ छापे; ४४ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध व्यवसायांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम राबवित एकाच दिवशी ११ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत जुगार व अवैध दारूविक्रीप्रकरणी एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ४४ हजार ६५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदिप दरवडे यांच्यासह पोलीस अंमलदारांची तीन पथके तयार करण्यात आली. या पथकांना जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती घेऊन तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार १८ ऑगस्ट रोजी संगमनेर शहर, नेवासा आणि श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगाराच्या एका कारवाईत ९ हजार ९४० रुपये, तर अवैध दारूविक्रीच्या तीन कारवायांमध्ये ८ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारूविक्रीप्रकरणी एका कारवाईत ५ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला.

# योगीराज सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराज हे महान योगी होते- महंत रामगिरीजी महाराज

## महापुरुषांच्या साधनेमध्ये विलक्षण शक्ती असते; आत्मा नित्य, अचल व सनातन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणतांबा :** योगीराज सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराज आज या सप्ताहाच्या माध्यमातून आपल्यातच आहेत.महापुरुषांच्या साधनेमध्ये एक विलक्षण शक्ती असते.सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराजांचीही अत्यंत कठोर साधना होती.त्यांनी गोदावरीच्या उदरातील सरला बेट येथे एकांतात साधना केली.सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराज हे महान योगी होते,असे प्रतिपादन गोदाधाम सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.



राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे सद्गुरू योगीराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या द्वितीय दिनाचे वाक्–पुष्प १ निमित्त गोदाधाम सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज यांच्या प्रवचनाने झाले. यावेळी बोलताना त्यांनी संतांचे आत्मस्वरूप, सगुण–निर्गुण उपासना, महापुरुषांची साधना, अनन्य भक्ती आणि कीर्तन परंपरेचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.श्री क्षेत्र धनगरवाडी पंचक्रोशीतील वाकडी चितळी जळगाव दिघी येथील ग्रामस्थांच्या वतीने तसेच राहाता तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने रामगिरीजी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र धनगरवाडी व पंचक्रोशीतील सप्ताह कमिटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने प्रवचनास उपस्थित होते.

महंत रामगिरीजी म्हणाले, संतांचा मृत्यू होत नसतो, कारण मरणारे शरीर असते; आत्मा कधीही मरत नाही. ज्याला शस्त्र तोडू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, वायू सुकवू शकत नाही आणि पाणी भिजवू शकत नाही, तो आत्मा कधीही नष्ट होत नाही. आत्मा नित्य, सर्वव्यापी, स्थिर, अचल आणि सनातन आहे. त्यामुळे संत आत्मस्थितीमध्ये स्थिर असतात. आत्मसुखाच्या गोडीमध्ये रंगलेले संत इंद्रियजन्य सुख–दुःखात कधीही रमत नाहीत. सद्गुरू गंगागिरीजी महाराजांची आपल्यावर कृपा आहे. ज्याप्रमाणे वीज यंत्राला फिरवते, त्याप्रमाणे भगवंत सर्व प्राणीमात्रांना भूतलावर फिरवतात.ही त्या परमात्म्याची कृपा आहे.परमात्म्याच्या कृपेनेच सर्व काही घडते.

ज्ञानेश्वर महाराजांसह सर्व संतांनी आपल्याला जो परमार्थ दिला, तो अतिशय शुद्ध परमार्थ आहे. सद्गुरू गंगागिरीजी महाराजांनीही आपल्याला हाच शुद्ध परमार्थ दिला आहे. आपले जे भजन सुरू आहे, ते अतिशय शुद्ध असून भगवंतासाठी आहे. ज्या गोपी भगवंताकरिता रडल्या, त्यांचे गीत झाले; म्हणून जो भगवंताकरिता रडतो, त्याचेही गीत होते, असे महंत रामगिरीजी महाराज यांनी सांगितले.

# ओव्हरफ्लोचे पाणी सिंचनासाठी द्या

## आ.आशुतोष काळेंची जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटलांकडे मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी



**कोळपेवाडी :** कोपरगाव मतदार संघात मागील काही दिवसापासून पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहे. त्यामुळे गोदावरी कालव्यांना सोडण्यात आलेल्या ओव्हरफ्लोच्या पाण्यातून खरीप पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्या अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात आमदार आशुतोष काळे यांनी असे म्हटले आहे की, कोपरगाव मतदार संघात पावसाळा सुरू झाल्यापासून अडीच महिन्यात समाधानकारक पाऊस झालेला नाही. जो काही पाऊस झाला त्या पावसावर शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील बाजरी, सोयाबीन, मका, तूर, कापूस आदी पिके उभी केली आहेत. जुलै महिन्यात पडलेल्या पावसाने सर्व पिकांना मोठा आधार मिळाला व सर्व पिके जोमात होती. परंतु ऑगस्ट महिना सुरू झाल्यापासून कोपरगाव मतदार संघात पाऊस पडलेला नाही त्यात उन्हाचे प्रमाण वाढत चालल्यामुळे पिकांना उन्हाचा चटका बसू लागला आहे. त्यामुळे खरीप हंगामातील बाजरी, सोयाबीन, मका, तूर, कापूस आदी पिके धोक्यात आली आहे.

सध्या गोदावरी डाव्या उजव्या कालव्यांना ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यात आलेले आहे त्या ओव्हरफ्लोच्या पाण्यातून या खरीप पिकांना तातडीने सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे सर्व धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली आहेत तसेच वरच्या धरणातून मोठ्या प्रमाणात खाली पाणी सोडण्यात आल्यामुळे जायकवाडी धरण देखील जवळपास पूर्ण क्षमतेने भरले असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

त्यामुळे सद्यस्थितीचा गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उभी केलेली खरीप हंगामातील पिके वाचवण्यासाठी व शेतकऱ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी गोदावरी कालव्यांना सोडण्यात आलेल्या ओव्हरफ्लोच्या पाण्यातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

# सकल माळी समाजाचा अधिकृत खुलासा; राजेंद्र पडोळे यांनी लेटरपॅडचा गैरवापर करून समाजाची दिशाभूल केली

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सकल माळी समाजाचे कामकाज हे समाजातील प्रमुख मान्यवर, दि. १० जून २०२४ रोजी निवड झालेले अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध समित्यांवरील १५० पदाधिकाऱ्यांच्या एकत्रित विचाराने सुरळीतपणे चालू आहे. या कामात अडथळा आणण्यासाठी काही विघ्नसंतोषी लोक प्रयत्न करत आहेत, हे अत्यंत चुकीचे आहे, असे सकल माळी समाजाने स्पष्ट केले आहे.

**लेटरपॅडचा अनधिकृत वापर:** सकल माळी समाज ट्रस्टच्या लेटरपॅडचा विना परवानगी आणि समाजाला विश्वासात न घेता वापर करून महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, धर्मादाय कार्यालय तसेच श्री विशाल गणपती मंदिर ट्रस्टच्या नावाने राजेंद्र पडोळे यांनी निवेदने देऊन आमरण उपोषण आणि आंदोलनाची घोषणा केली आहे. या भूमिकेशी सकल माळी समाजाचा कोणताही संबंध नाही.

सरकार दरबारी देण्यात आलेल्या निवेदनावर सकल माळी समाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त तसेच कोणत्याही अधिकृत पदाधिकाऱ्याची सही नाही. तरीही समाजाला अंधारात ठेवून खोट्या स्वाक्षऱ्या करून वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. यामुळे सकल माळी समाजात गैरसमज आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या अनधिकृत वापरासंदर्भात राजेंद्र पडोळे यांना दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी लेखी नोटीस देण्यात आली आहे. सकल माळी समाजाच्या लेटरपॅडचा वापर हा केवळ अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या अधिकृत परवानगीने होईल, असेही यात नमूद करण्यात आले आहे.

**नावे आणि फलकांचा गैरवापर:** राजेंद्र पडोळे यांनी सुरुवातीला या सर्व मागण्या नगरसेविका माननीय सौ. सुजाताताई पडोळे यांच्या नावाने पत्राद्वारे महापालिकेकडे मांडल्या होत्या. आता त्याच मागण्या सकल माळी समाजाच्या बॅनरखाली आंदोलनाचा इशारा देत सरकार दरबारी मांडण्यात आल्या आहेत.

राजेंद्र पडोळे यांनी दिलेल्या निवेदनावर सकल माळी समाजाच्या कोणत्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याची स्वाक्षरी नाही. तसेच शहरात लावण्यात आलेल्या आमरण उपोषणाच्या फलकांवरील जी नावे आहेत, त्यांनाही विश्वासात न घेता त्यांची नावे बळजबरीने वापरली आहेत. याबाबत समाज बांधवांनी पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून, आम्हाला न विचारता आमची नावे फलकावर टाकण्यात आली आहेत अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत.

**आंदोलनाला समाजाचा पाठिंबा नाही :** राजेंद्र पडोळे यांनी दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला होता. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सकल माळी समाजाचे स्वतंत्र व्यासपीठ आहे. परंतु वैयक्तिक फायद्यासाठी आणि समाजाला चुकीच्या दिशेने नेण्यासाठी सकल माळी समाजाच्या नावाचा वापर करून राजेंद्र पडोळे यांनी केलेल्या आमरण उपोषणास सकल माळी समाज बांधवांच्या वतीने कोणत्याही प्रकारचा पाठिंबा देण्यात आलेला नाही, असे सकल माळी समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

यापुढील काळात राजेंद्र पडोळे यांनी घेतलेल्या कोणत्याही उपक्रमांशी सकल माळी समाजाचा सहभाग व पाठिंबा राहणार नाही. याची शहरातील व जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी नोंद घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

राजेंद्र पडोळे यांना नगरसेवक घराण्याचा राजकीय वारसा लाभला असल्याने त्यांनी राजकीय बॅनर घेऊनच शहराच्या समस्या सोडवाव्यात,अशी सकल माळी समाजाची मागणी आहे.

सकल माळी समाजाचे अध्यक्ष– किशोर डागवले उपाध्यक्ष–बाळासाहेब भुजबळ यांनी या पत्र दिले आहे.

# मनात व डोक्यात नेहमी असावेत सकारात्मक विचार




समाजाची सरंचना पूर्णपणे युवा अवस्थेवर अवलंबून असते. समाजाची प्रगती युवकांमार्फतच होऊ शकते. आजचा युवा वर्गच उद्याची पारिवारिक स्थिती सांभाळेल व येणारी नवीन पिढी त्यांचे अनुकरण करेल. वर्तमान व भविष्य दोन्ही युवाच सांभाळू शकतील. युवावर्ग ही एक अशी शक्ती आहे की प्रगतीची क्रांती करुन विकासाचा मार्ग बनवू शकते. परंतु असे दिसून येते की, आपले व्यक्तीमत्व आकर्षक बनविण्यासाठी वर-वरती चमकधमक महत्वाची आहे असे आजकालचे युवा मानतात. चांगले कपडे घालणे, गाड्यांमध्ये फिरणे, पार्ट्यांना जाणे, महाग सौंदर्य प्रसाधने, वापरणे, महाग भेटवस्तू मित्र मंडळींना देणे इ. हे सर्व क्षणिक आकर्षण आहे. वास्तविक आकर्षण तर एखाद्या व्यक्तीच्या व्यवहारावरुन, त्याच्या सवयीवरुन व त्याच्यातील गुणांवरुन ठरविले जाते.

व्यवहारिक ज्ञान कोणत्या शाळेतून, कॉलेजमधून पुस्तके वाचून मिळत नसते तर ते घर परिवार, शेजारी, समाज यांच्या निरीक्षणातून, ऐकून बघून प्राप्त होते.

- आपल्या व्यवहारात नेहमी सॉरी व थँक यू' हे दोन शब्दप्रयोग वापरा. तुमची प्रत्येक ठिकाणी स्तुती करतील.
- जीवनरुपी शृंगाराचा अत्यावश्यक हिस्सा म्हणजे विनम्रता यामुळे तुमचे व्यक्तीमत्व अजून उजळेल.
- आपल्या पेक्षा मोठ्यांचा आदर व लहांनाना स्नेहपूर्वक वागणूक द्या. समाजात स्नेह व सन्मान या एकमेकांच्या कड्या आहेत.
- घरात, नातेवाईकांमध्ये, मित्रांमध्ये वावरताना वातावरण शांतीपूर्ण असेल याकडे लक्ष द्या. आपल्या वाणीत माधुर्य आणा.
- आपली चूक स्वीकारायला शिका, त्यामुळे नवीन काही शिकायला मिळेल.
- इतरांची निंदा करण्याची प्रवृत्ती टाळा. त्यामुळे तुम्ही दुसऱ्यांच्या नजरेतून पडू शकता.
- मित्रांची खोटी स्तुती करु नका. उलट त्यांच्या चुका, कमजोरी, वाईट सवयी, दुर्गुण त्यांच्या निदर्शनास आणून द्या व सुधारण्यासाठी त्यांना मदत करा.
- इतरांना मदत करण्याची सहयोगी देण्याची सवय अंगी बाळगा दुसऱ्यांच्या सुख-दु:खात, आजारपणात त्यांची मदत करा.
- वेळेचे महत्व समजून घ्या व वेळेचा सदुपयोग करा.
- क्रोधाला आवर घाला, त्यापासून सावध रहा कारण क्रोध मनुष्याच्या स्वास्थाला व डोक्याला मेंदूला अतिशय हानिकारक आहे.
- मनात व डोक्यात नेहमी चांगले विचार ठेवा. सकुंचित विचार डोक्यातून काढून टाका.
- अंधविश्वासू बनू नका. कोणतीही गोष्ट तर्कशुद्ध कसोटीवर परिपूर्ण ठरल्यानंतरच तिचे पालन करा.
- नेहमी नव-नवीन शिकण्याची इच्छा बाळगा. शिकण्यासाठी वयाची अट नसते हे लक्षात ठेवा. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण असतात ते गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.
- आपल्या कामात नेहमी मेहनत, इमानदारी आणि मन लावून काम करणे इ. चा समावेश असू द्या.
- स्वावलंबी बना. इतरांवर आपले काम सोपवू नका.
- अहंकारापासून चार हात लांब रहा. अहंकारी व्यक्ती आपले व्यक्तीमत्व धुसर व अंधुक बनवते.

## कुटुंबात मानसिक आधार महत्वाचा...

कौटुंबिक जीवनात नातेवाईकांची परिस्थिती कशी आहे यापेक्षा सुद्धा ती मनाने परस्परांशी कसे वागतात, चांगले स्नेह मैत्रीचे संबंध ठेवतात की नाही एकमेकांना अडचणीच्या आणि नंतरही मानसिक आधार देतात का ? याला अधिक महत्व असते. ज्यांची नाती अकाली कालवश होतात वा काही कारणांमुळे अखेरपर्यंत टिकत नाहीत, त्यांना घोर मानसिक आघाताला सामोरे जावे लागते. एखादी व्यक्ती स्वत:ला दु:खातून किती लवकर सावरू शकते हे सर्वस्वी त्याच्या 'विल पॉवर'वर अवलंबून असते. बहुधा महिलांनाच मानसिक आघाताला जास्त सामोरे जावे लागते. स्वप्नांचा महाल, सुखी संसार जेव्हा उद्ध्वस्त होतो तेव्हा त्याचा खूपच जबर धक्का बसतो. या दु:खातून जो गेलेला असतो तोच समजू शकतो. प्रत्येकजण जीवनात वेगवेगळ्या गोष्टींना महत्त्व देत असतो. कोणाला प्रेम महत्त्वाचे वाटते तर कोणाला करियर. आपल्याला जे हवे ते मिळेल याविषयी स्वप्ने पाहायला काहीच हरकत नाही; पण त्यासोबतच व्यावहारिक दृष्टीकोनही ठेवणे अत्यंत गरजेचे असते. स्वप्नांची हवा कधीही



डोक्यात शिरू देऊ नये. कारण जेव्हा ती स्वप्ने भंगतात तेव्हा खूपच त्रास होतो; परंतु कोणत्याही स्थितीत आपली हिंमत सोडू नये आणि आपले ध्येय गाठण्यातच सातत्याने प्रयत्न करीत राहावे.

कधी-कधी महिला आपले ध्येय गाठण्यात अपयशी ठरल्यानंतर हतबल होऊन डिप्रेशनने घेरल्या जातात. त्यांनी आपण पुन्हा प्रयत्न केला तर यशस्वी होऊ शकतो हे समजून घ्यायला हवे. अपयश आपला आत्मविश्वास डळमळीत करीत असते हे खरे; पण आपणही धैर्य बाळगायला हवे. आपले धैर्य, आपली हिंमत टिकून राहण्यासाठी खालील सल्ला अनुसरा.

- अपयश पदरी पडेल तेव्हा सर्वप्रथम स्वत:ला भावनिक रूपाने कमकुवत होऊ देऊ नका. स्वत:ला नशिबाच्या हाती सोपवू नका. स्वप्नांच्या महालाच्या ठिकऱ्या झाल्यातरी त्या पुन्हा जोडू शकता; पण त्यासाठी हिंमत सोडू नका.
- आपले लक्ष रचनात्मक कामात जास्त गुंतवा. उदा. काही लिहिण्याचा प्रयत्न करा लेखन हे भावना व्यक्त करण्याचे सर्वश्रेष्ठ माध्यम आहे.
- घरी कधीही एकट्या राहू नका. त्यामुळे भीती वाढते. जर दुसरा काहीच पर्याय नसेल, तर घरातील किरकोळ कामे करीत राहा व एखाद्या मैत्रिणीला फोन करून गप्पा मारा शॉपिंगसाठी बाहेर पडल्यानेही मन हलके होईल.
- जर आपण थोडे जरी मन घट्ट केले, तर लवकरच दु:खातून बाहेर पडाल. काळ साऱ्या जखमा भरेल; पण त्यासाठी थोडा संयम हवा.
- स्वत:वर विश्वास ठेवा. एक स्वप्न भंगले याचा अर्थ स्वप्न पाहायचेच सोडून द्यावे असा नव्हे.

## स्वत:च्या जीवनाचे बना शिल्पकार



जेव्हा आपण एखादी कला शिकण्याचा विचार करतो तेव्हा त्या कलेविषयी मनात आत्मीयता असते. ती शिकण्याची आत्मसात करण्याची उर्मी असते. आणि शिकल्यानंतरही ती कला साकारताना आपल्या मनात आनंदाच्या उर्मी उठत असतात. आपल्यात असा काही खास गुण असावा की, ज्याच्या बळावर इतरांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. अशी प्रत्येकाचीच मनीषा असते. त्यासाठी आपल्याला आपले जीवन व्यर्थ जाऊ देता कामा नये. त्यातील प्रत्येक क्षण सृजन करायला हवा. आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हायला हवे. यासाठी गरज आहे स्वत:शी प्रामाणिक होण्याची.

आपण जे काम करतो ते जर प्रसन्नतेने केले, प्रेमाने केले, निस्वार्थपणे केले तर ते काम आपोआपच सृजन होते याचाच अर्थ काम करताना स्वत:ला फसवू नका. स्वत:च्या नजरेत स्वत:च्या नजरेत स्वत: कमी होऊ नका. त्याचबरोबर इतरांशीही लबाडीने, कपटाने वागू नका.

सृजनतेसाठी माणसाने आपल्या जीवनात संतुलन वाढवायला हवे. जीवन म्हटले की चढ-उतारही येतात. जो वेगवेगळ्या परिस्थितीत समान भावनेने झेलतो व निराशा, उदासीनतेपासून दूर राहतो त्याच्याच अंतरी आशा, प्रसन्नता व आनंदाचा प्रकाश पसरतो. अशीच माणसे खरी कलाकार, सृजनकार होतात. कारण ती आपण अंत:स्फूर्तीने साकारत असतो ती कोणी आपल्यावर लादलेली नसते.

हीच गोष्ट आपल्या कामाबाबतही आपण आपण जोपासायला हवी. आपण करीत असलेले काम आपण निवडलेलेच असते. तर मग त्याबाबत फक्त पाट्या टाकणे ही भावना का ठेवायची ? जर आपल्याला एकादे काम आवडत नसेल तर ते करण्यात आपला वेळ वाया का दवडायचा ! कारण यातून ते कामही व्यवस्थित होत नाही व आपणही आपले अमूल्य जीवन वाया दवडीत असतो.

जर आपण आपले काम एक कला म्हणून जोपासले तर नक्कीच ते जास्त अस्थेने, तळमळीने करू शकतो. नवनवीन बदल घडवू शकतो व ते काम व्यवस्थित व उत्तमरीत्या पार पाडल्याचा आनंद मिळवू शकतो. हा आनंद त्या कामाच्या पैशारूपी, प्रसिद्धीरूपी मोबसल्यापेक्षा कैकपटीने मोठा असतो. जी आनंदाने केली जातो ती कला असते. व जे बळजबरीने केले जाते ते काम असते. आपणच ठरवा की आपल्याला आपली कला जोपासायची आहे की फक्त कामच करीत राहायचे आहे.

## लग्न ही जीवनातील अत्यंत महत्वाची बाब



वयात आलेल्या, सज्ञान झालेल्या मुलीबद्दलची चिंता तिचे हात पिवळे करून तिला निरोप देईपर्यंत आई-वडिलांना सतावीत असते. सर्वच आई-वडिलांना मुलीच्या काळजीतून मुक्त होण्याची घाई असते. त्यामुळेच तिचे लग्न लावून देताना ते तिच्या भावनांचा विचारही करीत नाहीत. ज्यामुळे लग्नानंतर तिच्या वैवाहिक जीवनात अनेक प्रश्न उपस्थित होतात. लग्न ही जीवनातील अत्यंत महत्वाची बाब असते. त्यात स्त्रीला सहनशील, त्यागी व समर्पित व्हावे लागते व त्यानंतर तिच्या जीवनाला नवे वळण मिळणार असते. तसे घरातील सर्वांचीच मुलीला तिच्या सासरी सुखी, आनंदी पाहण्याची इच्छा असते. म्हणूनच तिचे लग्न उत्तम, सुखवस्तू कुटुंबातील मुलाशी करण्याची इच्छा ते बाळगून असतात. परंतु अशावेळी त्यांच्याकडून मुलीच्या इच्छेकडे, आवडी-निवडीकडे दुर्लक्ष केले जाते. त्याला महत्व दिले जात नाही व एखादा मुलगा बरा वाटला की, चटकन मुलीचे लग्न करण्याची घाई त्यांच्याकडून केली जाते.

या घाईगडबडीत मुलाच्या सवयी, घर-घराणे, वागणे याचाही विचार केला जात नाही. तसेच मुलाच्या मानसिक, शारीरिक गुणदोषांचाही विचार केजा जात नाही व याचा त्रास मुलीला भोगावा लागतो. बहुधा मुलीच्या शिक्षणाला काहीच किंमत दिली जात नाही. मॅट्रिक-नॉनमॅट्रिक मुलाशी बी.ए.पास मुलीचेही लग्न लावून दिले जाते. का तर तो सरकारी नोकरी करतो आहे म्हणून. त्यामुळे तिचे जीवन सर्वस्वी आई-वडिलांच्या निर्णयावरच अवलंबून असते. परंतू आता जमाना बदलला आहे. पूर्वी लहान वयातच मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलगा याचा विचार तिच्या माता-पित्यांना व घरातील इतर वडीलधाऱ्यांना करावा लागत असे. पण आता मुलगी वयात आल्यानंतर, शिकून-सवरुन सुजाण व सज्ञान झाल्यानंतर तिच्या भावी आयुष्याबद्दल व पतीबद्दल ती विचार व कल्पना करु शकते. त्या जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते. विशेषत: मुलीच्या आई, वहिनी व मोठ्या बहिणींनी याबाबत पुढाकार घ्यायला हवा.

## पुरुषांचा लाळघोटेपणा नैसर्गिक

कितीही नाही म्हटले तरी पुरूषांना आपल्या सभोवती स्त्री असावी असे वाटते यात काहीही खोटं नाही. स्त्री सहवास त्याला सुखावणारा असतो. स्त्रियांशी लाळघोटेपणा करायलाही त्याला आवडतो. पण त्याच्या या स्वभावाला निसर्ग कारणीभूत असल्याचे आता शास्त्रीय संशोधनातून सिद्ध झाले आहे.

सुंदर स्त्री आजूबाजूला असली की शरीरातले टेस्टॅटेरॉन आणि कार्टिसोल या हार्मोन्सची संख्या तात्पुरती वाढते. या हार्मोन्सच्या वाढण्यामुळे पुरूषाच्या हजरजबाबीपणालाही धार येते, शिवाय त्याला मस्त वाटते. पण तीच स्त्री दुसऱ्या कुठल्या पुरूषाशी बोलत असेल वा त्याच्यात रस घेते आहे, असे लक्षात आले तर मात्र या दोन्ही हार्मोन्सची पातळी खाली घसरायलाही वेळ लागत नाही. त्यामुळे नैराश्य आणि चीडचीडही होते. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी यासंदर्भात संशोधन केले आहे. त्याचे निष्कर्ष रॉयल सोसायटीच्या मासिकात प्रसिद्ध झाले आहेत. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. जेम्स रॉनी यांनीही या निष्कर्षांना पुष्टी दिली असून पुरुष स्त्रीशी बोलल्यास हे दोन्ही हार्मोन्स वाढतात, मात्र, ती स्त्री इतर कुठल्या पुरूषाशी बोलू लागली की याचे हार्मोन्स घसरतात, असे ते म्हणाले. १८ ते २४ वयोगट असलेल्या १४९ विद्यार्थ्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले.

## कपडे खरेदी करताना...



हल्ली पंजाबी सूट व बंटी बबली स्टाइल सूटची जास्त फॅशन आहे. सडपातळ बांध्याच्या मुलींना ते शोभून दिसतील.

ज्या मुली उंच आहेत व त्या उंची कमी दर्शवू इच्छित असतील, तर आडव्या लायनिंगच्या ड्रेसने त्या उंची कमी दर्शवू शकतील याऊलट कमी उंचीच्या मुली उभ्या लायनिंगच्या ड्रेसद्वारे आपली उंची जास्त दर्शवू शकतील.

तरूण मुलींमध्ये स्कर्टस, जीन्स, कॅपरीजची जास्त फॅशन आहे; परंतु नेहमी आपल्याला शोभून दिसणारेच ड्रेस घालावेत. फॅशनपायी दिसेल तो ड्रेस परिधान करू नये. कारण त्यामुळे विनाकारण आपण सर्वांच्या दृष्टीने चेष्टेचा विषय होतो.

कपडे खरेदी करताना आपला रंग कसा आहे ते आवर्जून पाहावे. सावळ्या रंगावर गडद रंगाचे कपडे जास्त शोभून दिसतात तर गोऱ्या रंगावर सर्व रंगांचे कपडे शोभतात.

कपडे परिधान करताना ऋतूचा खास विचार करावा. जर उन्हाळा असेल, तर सौम्य रंगांचे कपडे शोभून दिसतील, तर थंडीत भडक रंगांचे कपडे सुखावह दिसतील. उन्हाळ्यात लाइट ऑरेंज, पिंक, लाइट ब्ल्यू, पीच, पॅरट ग्रीन आणि मोव्ह डोळ्यांना जास्त सुखावतात व शरीरातही गारवा देतात. याउलट थंडीत भडक रंगांचे कपडे घातल्यास ते उष्णतेचा आभास देतात.


भारतात सावळ्या रंगाच्या व्यक्ती जास्त आढळतात. गौरवर्णी व्यक्तींना रंगाची निवड करताना जास्त त्रास पडत नाही; परंतु सावळ्या व्यक्तींनी नक्कीच दक्षतेने रंगांची निवड करायला हवी. त्या गडद रंगाची निवड करू शकतात. फिकट रंगांमध्ये पिंक, फिकट क्रीम, पांढरा रंग छान दिसतो. रंगांच्या निवडीविषयी व्यवस्थित माहिती घेऊनच आपण आपले कपडे खरेदी करावेत व परिधान करावेत आणि हास्याचा विषय होणे टाळावे.

## आजच्या काळात अतूट मैत्री शक्य

आधुनिक काळात व्यापार वाढविण्यासाठी मोटारीपासून स्वयंपाकाच्या भांड्यांपर्यंत कोणतीही गोष्ट दोन-पाच वर्षांपेक्षा जास्त काळ टिकणार नाही, अशी खबरदारी घेऊनच बनवली जाते. या 'यूज ॲण्ड थ्रो' (वापरा आण टाकून द्या) या पद्धतीची सवय झाल्यामुळे की काय, माणूस तीच पद्धत मानवी नातेसंबंधांना लागू करतो आहे. ज्यांचा उपयोग असेल त्याच माणसांशी संबंध ठेवायचा, असं नव्या पिढीचं रोखठोक धोरण आहे.

यातून मैत्रीसारखी निर्व्याज भावनाही सुटलेली नाही. साधारणत: मैत्री हे माणसाच्या आयुष्यातलं सर्वांत नि:स्वार्थी आणि म्हणूनच श्रेष्ठ नातं मानलं जातं. भावुक भारतीयांची तर मैत्रीसारखं दुसरं नातं नाही, अशी धारणा दिसते. सहाव्या-सातव्या-आठव्या दशकापर्यंत दोस्तीचे गोडवे गाणारे चित्रपट मोठ्या संख्येने निघायचे. 'दोस्त', 'दोस्ती' अशीच सिनेमांची नावं असायची. 'ये दोस्ती हम नही तोडेंगे....तोडेंगे हम मगर तेरा साथ ना छोडेंगे'सारखी गाणी लिहीली जायची.

आत्ताच्या काळात असे चित्रपट आणि गाणी आढळत



नाहीच. चित्रपट हे समकालीन परिस्थितीच प्रतिबिंब असतं, हेच खरं. चित्रपटाच नाव दोस्ताना असलं तरी, त्यात दोस्तीची उत्कटता जाणवत नाही. नुसतं मौजमजा करण्यासाठी काही काळ एकत्र येणं, हीच नव्या काळात दोस्तीची एक तऱ्हा झालीय.

दुसऱ्या तऱ्हेत आजचा माणूस फक्त उपयुक्तता लक्षात घेऊन इतरांशी संबंध ठेवतो. त्यांना दोस्तीचं लेबल लावलं जातं; पण ते निव्वळ लेबलच असतं. समोरच्या माणसामुळे आपला काय फायदा होईल, आपला बिझनेस वाढेल का, कॉन्टॅक्ट्स वाढतील का, काही वस्तू स्वस्तात मिळतील का, या गोष्टींचा विचार करून आधुनिक माणूस मैत्री करतो. आपण दुसऱ्याला काय देणार, हा मैत्रीतला पायाभूत विचार तो करीतच नाही. असं का होतं, याचा खुलासा करताना आयटी (माहिती आणि तंत्रज्ञान) क्षेत्रात काम करणारा, २७ वर्षांचा राहूल शिंगरे म्हणतो, 'तीस-चाळीस वर्षांपूर्वी सामाजिक वातावरण निवांत आणि संस्कारपूर्ण होतं. आज शैक्षणिक आणि कार्यालयीन क्षेत्रं नको इतकी स्पर्धक झाली आहेत. परीक्षेत जास्तीत जास्त टक्केवारी आणि ऑफिसमध्ये लवकरात लवकर प्रमोशन मिळवणं, प्रसिद्धी मिळवणं हेच माणसाचं ध्येय झालं आहे. सख्खी भावंडं आणि पती-पत्नी यांनासुद्धा स्पर्धा चुकत नाही. आजच्या काळात माणसांचे एकमेकांशी चांगले संबंध असू शकतात; पण मैत्री होणं मुश्कील आहे.'

## बेडरूममध्ये कोणत्या प्रकारचे फोटो लावावेत

बेडरूम हे घरातील सर्वात महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे बेडरूमच्या स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाते. बेडरूममध्ये ठेवण्यात आलेल्या वस्तुंचा प्रभाव पती-पत्नींच्या नातेसंबंधांवर पडत असतो. त्यामुळे वास्तुशास्त्रानुसार बेडरूममध्ये कोणत्या प्रकारचे फोटो लावावेत आणि कोणते लावू नयेत याविषयी काही नियम आहेत. नवरा-बायकोमधील संबंध प्रेमाचे राहण्यासाठी बेडरूममध्ये वास्तुदोष असू नये. शिवाय वास्तुदोष वाढविणारे फोटोही बेडरूममध्ये लावू नयेत. नकारात्मक विचार वाढविणारे फोटो लावू नयेत. देव-देवतांचे फोटो लावणे योग्य नाही. परंतु राधा-कृष्ण यांची मूर्ती किंवा प्रतिमा लावली तरी चालू शकेल. मनाला प्रसन्न वाटेल असे फोटो बेडरूममध्ये लावावेत. घरातील सदस्याचे फोटो लावले तरी चालू शकेल. आनंदी क्षण टिपणारे फोटो लावल्यास त्याचा चांगला परिणाम होतो.

# विरळ झालेल्या आयब्रो जाड-भरीव करण्याचा खास उपाय

आपल्या आयब्रो जाड, भरगच्च, काळ्याभोर असाव्यात असे प्रत्येकीलाच वाटत असते. यासाठी आपण आपल्या आयब्रोजची वेगवेगळ्या पद्धतीने काळजी घेतो. आयब्रोचे केस काळेभोर आणि जाड दिसण्यासाठी आपण आयब्रो पेन्सिल, सिरम, ऑईल असे अनेक उपाय करून पाहतो. परंतु हे उपाय वरवरचे असून कायम टिकून राहणारे नसतात. सध्या आयब्रोचे केस अधिक भरगच्च आणि गडद काळभोर दिसावे यासाठी आयब्रो टिंटिंग करण्याचा एक नवा ट्रेंड सुरु आहे. या आयब्रो टिंटिंग ब्यूटी ट्रिटमेंटमध्ये आपल्या आयब्रोचे केस एका विशिष्ट पद्धतीने रंगवले जातात. ज्यामुळे आपल्या आयब्रोचे केस भरगच्च आणि गडद काळभोर दिसतात. ही ब्यूटी ट्रिटमेंट केल्याने आपल्याला वारंवार आयब्रो करावे लागत नाहीत, तसेच आयब्रोचे केस पातळ, विरळ असतील तर ते अधिक जाड आणि गडद होण्यास मदत होते. आयब्रो टिंटिंग म्हणजे काय, ते कसे केले जाते याविषयी अधिक माहिती घेऊयात.

**आयब्रो टिंटिंग म्हणजे काय ? :** आयब्रो टिंटिंग ही सध्या फारच ट्रेंडमध्ये असणारी एक ब्यूटी ट्रिटमेंट आहे. यात आपले आयब्रो अधिक जाड आणि दाट होण्यास मदत होते. आयब्रो टिंटिंग या ब्यूटी ट्रिटमेंट मध्ये आयब्रोच्या केसांवर एका विशिष्ठ प्रकारची सेमी - पर्मनंट डाय लावली जाते. ही डाय लावल्यामुळे आपल्या आयब्रोचे केस अधिक जाड, दाट आणि काळेभोर दिसतात. या ट्रिटमेंटमध्ये फक्त आयब्रोचेच केस नाही तर त्यांच्या आसपासचे बारीक केस देखील रंगवले जातात. यामुळे आपले आयब्रो अधिकच सुंदर आणि आखीव रेखीव दिसतात.



आयब्रो टिंटिंग ही ब्यूटी ट्रिटमेंट सेमी पर्मनंट पद्धतीची आहे. ही ब्यूटी ट्रिटमेंट तुम्ही एकदा करुन घेतल्यानंतर तिचा परिणाम काही महिनेच टिकून राहतो. एका ठराविक काळानंतर आपल्या आयब्रोला दिलेला रंग फिका पडून नाहीसा होतो. अशावेळी आपल्या आयब्रोवरील हा आर्टिफिशियल रंग उडून आपले आयब्रो आधी होते तसेच पुन्हा पाहिल्यासारखेच दिसतात.

**आयब्रो टिंटिंग ब्यूटी ट्रिटमेंटमध्ये नक्की काय केले जाते ? :** तुमच्या आयब्रोचा प्रकार कसा आहे यावर आयब्रो टिंटिंग करण्यासाठी किती वेळ लागेल हे ठरवले जाते. साधारणतः आयब्रो टिंटिंग करण्यासाठी १५ ते २० मिनिटांचा वेळ लागतो. जर तुमच्या आयब्रोची लांबी आणि जाडी अधिक असेल तर आपल्याला जास्त वेळ लागू शकतो. आयब्रो टिंटिंग करण्यासाठी सर्वात आधी तज्ज्ञ तुमच्या त्वचेच्या कॉम्प्लेक्सनुसार आधी डाय तयार करतात. यानंतर, भुवया स्वच्छ केल्या जातात आणि त्वचेभोवती पेट्रोलियम जेलीचा पातळ थर लावला जातो. त्यानंतर तयार केलेली डाय आपल्या आयब्रोवर लावली जाते. ही डाय आपल्या आयब्रोवर आधी केस ज्या दिशेने आहेत त्या दिशेने लावली जाते, त्यानंतर केसांच्या विरुद्ध दिशेने लावली जाते. डाय लावून झाल्यानंतर थोडा वेळ ती तशीच ठेवून सुकण्यासाठी थोडा वेळ दिला जातो. त्यानंतर जास्तीची डाय जी आजूबाजूला लागली आहे ती पेपर टॉवेलने पुसली जाते.

**किती काळासाठी ही डाय टिकून राहते ? :** आयब्रोला डाय केल्यानंतर चार ते सहा आठ्वड्यापर्यंतच हा रंग आयब्रोवर टिकून राहतो. त्यानंतर हा रंग हळूहळू फिका होऊन निघून जातो. यासाठी आपल्याला दर चार ते सहा आठवड्यांनी आयब्रोला रंग देऊन टिंटिंग करावे लागते. **घरच्या घरी आयब्रो टिंटिंग कसे करावे ? :** घरच्या घरी सोप्या पद्धतीने आयब्रो टिंटिंग करण्यासाठी आपल्या आयब्रोच्या केसांच्या रंगापेक्षा फिकट शेडची डाय घ्यावी. सगळ्यात आधी चेहरा स्वच्छ धुवून आयब्रो व्यवस्थित वाळवून घ्याव्यात. त्यानंतर छोटया ब्रशने आयब्रोचे केस विंचरून ते व्यवस्थित एका सरळ रेषेत आणावे. त्यानंतर आयब्रोच्या चारही बाजुंनी पेट्रोलियम जेल लावून घ्यावे. जेल लावल्यानंतर आयब्रोवर ब्रशच्या मदतीने डाय लावून घ्यावी. १० ते १५ मिनिटे डाय वाळू द्यावी. त्यानंतर १५ मिनिटांनी पेपर टॉवेलने ही वाळलेली डाय पुसून घ्यावी.

## टरबूज किंवा गाजरच नाही, तर ही लाल फळे आरोग्याला फायदेशीर



निरोगी राहण्यासाठी निरोगी दिनक्रमाबरोबरच आहारामध्ये भरपूर पोषक तत्त्वे असलेली लाल फळेसुद्धा गरजेची आहेत. व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अँटिऑक्सिडंट्सयुक्त असलेल्या या गोष्टी बऱ्याच आजारांपासून बचाव करतात.

**१. बीट** : अँटिऑक्सिडंट, पोटॅशियम, फायबर, फॉलेट आणि व्हिटॅमिन्सने भरपूर बीट आरोग्यासाठीच नव्हे, तर त्वचेसाठीसुद्धा खूप फायदेशीर आहे. यात आढळणारी पोषक तत्त्वे शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करतात.

**२. कांदा** : कांद्यामध्ये सल्फर, अमिनो ॲसिड, फायबर्स आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे कांदा पोटाच्या आजारांपासून वाचवतो. याने इन्सुलिन लेव्हल स्थिर राहते आणि मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. यामुळे केसांची लांबी वाढते. कांदा ॲनिमिया आणि अशक्तपणापासून बचाव करण्यास मदत करतो.

**३. स्ट्रॉबेरी** : स्ट्रॉबेरीत पोटॅशियम, फायबर्स, आणि कार्बोहायड्रेट्ससारखी शरीरासाठी गरजेचे पोषक तत्त्वे असतात. हे हृदयरोगापासून वाचवण्यात मदत करतात.याने इम्युन सिस्टिम मजबूत होते आणि सारखे आजारी पडण्यापासुन सुटका होते. हे अस्थमा आणि गाठ्यासारख्या रोगावरील उपचारात परिणामकारक आहे.

**४. टोमॅटो** : व्हिटॅमीन सी, लायकोपिन आणि पोटॅशियमने भरपूर टोमॅटो कोलेस्टेरॉल आणि वजन कमी करण्यास सहायक आहे. याचा मधुमेहातही फायदा होतो. यामुळे दृष्टी वाढवण्याबरोबरच त्वचेशी संबंधित समस्यांपासून सुटका होते. यात असलेल्या कॅल्शियममुळे हाडे बळकट होतात.

**५. सफरचंद** : सफरचंद खाण्याने कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग यांपासून बचाव होऊ शकतो. यामुळे दातांचा पिवळेपणा दूर होतो. यकृताला मजबूत बनवतो. सफरचंदाच्या सेवनाने शरीरात मुतखडा होण्यापासून बचाव होतो आणि ऊर्जा वाढवण्यातसुद्धा मदत होते.

**६. डाळिंब** : अँटिऑक्सिडंट्सने भरपूर डाळिंब प्रजनन क्षमता वाढवण्यात मदत करतात. रोज मूठभर डाळिंबाचे दाणे खाल्ल्याने कर्करोग, तणाव, हृदयविकाराचा झटका यांसारख्या आजारांपासून बचाव होतो. गरोदरपणात महिलांसाठी हे खाणे लाभकारी आहे. हे ॲनिमियातही लाभकारी आहे.

## चमचमीत मिसळ तयार करणे इतकेही अवघड नाही

**साहित्य :** ५०० ग्रॅम मोड आलेली मटकी, २ कांदे, २ टोमॅटो, १०-१२ लसूण पाकळ्या, ४-५ हिरव्या मिरच्या, १ इंच आल्याचा तुकडा, १ लहान काडी दालचिनी, २ लवंगा, १ तमालपत्र, १ चमचा धनेपूड, २ चमचा गोडा मसाला, २ चूमचे किसलेलं सुकं खोबरं, १ चमचा खसखस, चिंच, चवीनुसार तिखट (कश्मीरी लाल मिर्च), चवीनुसार मीठ, कोथिंबीर, तेल, मोहरी, हिंग, फरसाण, लिंबू, पाव किंवा ब्रेड

**कृती :** मोड आलेली मटकी कुकरमध्ये शिजवून घ्या.

कट बनवण्यासाठी लसूण पाकळ्या, आले, मिरच्या, दालचिनी, लवंगा, तमालपत्र, धनेपूड बारीक वाटून घ्या.

कढईत जरा तेल गरम करुन त्यात मसाला खमंग परतून घ्या. सुवास आल्यास चिरलेला कांदा आणि टॉमेटो घालून परता.

नारळ घालून परतावा.

मिश्रणाला तेल सुटले की गॅस बंद करून बाजूला काढून थंड करा.

मिश्रण थंड झाल्यावर त्यात १ ग्लास पाणी मिसळून पातळ पेस्ट तयार करा.

पुन्हा कढई गरम करुन हिंग, हळदाची फोडणी तयार करुन त्यात मसाला आणि लाल खिट घाला. मीठ घाला.

चिंचेचा कोळ घाला.

आवश्यकतेनुसार पाणी घालून उकळी घ्या.

दुसऱ्या बाजूला २ चमचे तेल गरम करुन त्यात मोहरी, हिंग, हळदाची फोडणी देऊन मटकी घाला.

जरा पाणी घालून त्यात गोडा मसाला घालून उकळून घ्या.

आता उसळ आणि कट तयार आहे.

## मुलांसाठी पावसाळी चपला/बूट खरेदी करताय?

शाळेचे दप्तर, डबा, बाटली, वह्या-पुस्तके, ड्रेस या सगळ्यांची शॉपिंग तर असतेच पण त्यासोबत आणखी एक महत्त्वाची शॉपिंग असते ती म्हणजे रेनकोट, रेनी शूज आणि छत्री यांचे. दरवर्षी नव्या फॅशनचे रेनी शूज घेण्यासाठी लहान मुलं आवर्जून हट्ट करतात.

बाजारात सध्या मोठ्यांसोबतच लहान मुलांच्या रेनी शूज आणि चपलांचे अनेक आकर्षक नवनवीन पॅटर्न पाहायला मिळत आहेत. गेल्या दोन वर्षात कोरोनाच्या महामारीमुळे आपण कोणीच बाहेर पडत नसल्याने खरेदीही पूर्णपणे बंद होती. पण यंदा शाळा आणि इतर गोष्टी पूर्वीप्रमाणे सुरू झाल्याने आपल्यासोबत लहान मुलांचीही जोरदार खरेदी सुरु आहे. शाळा, क्लास किंवा इतर ठिकाणीही बाहेर जाताना पावसाळ्यात हमखास ठिकठिकाणी पाणी साठलेले असते. लहान मुलांना पाण्यात खेळायला आवडत असल्याने ते बाजूने जागा असली तरी त्यामध्ये उड्या मारणे, हे पावसाचे पाणी पायाने उडवणे असे प्रकार करताच. अशावेळी त्यांच्या पायाला पाण्यातील घाण लागू नये, कपडे शक्यतो स्वच्छ राहावेत या दृष्टीने पालक म्हणून आपण चांगल्या पावसाळी चपला किंवा बूट घेतो.

म्हटलं तर बूट पण म्हटलं तर चप्पल अशा पावसाळ्यासाठी मिळणाऱ्या या मोकळ्याढाकळ्या क्रॉक्सची गेल्या काही वर्षांपासून चांगलीच स्टाईल आहे. याला गोलांची डिझाईन असल्याने पाणी तर साठून राहत नाहीच पण हे मोकळे आणि तरीही बंद असल्याने पाय झाकले जाऊन खराब होण्याचीही शक्यता नसते. काढायला-घालायला आणि सगळ्यात महत्त्वाचे वाळण्यासाठी क्रॉक हा प्रकार अतिशय सोपा असल्याने अनेक जण चपलांच्या या हटके प्रकाराला पसंती देतात. इतकेच नाही तर हा प्रकार युनीसेक्स असल्याने मुलांसाठी आणि मुलींसाठी एकाचवेळी खरेदी करता येऊ शकते.

मुलींच्या चपलांमध्ये वेगवेगळे रंग आणि नाजूक अशा अनेक आकर्षक डिझाईन्स पाहायला मिळतात. त्यामुळे एखादा सणावाराचा किंवा थोडा हेवी ड्रेस घातला असेल तरी या चमचमत्या किंवा हिल्स असलेल्या अशा काहीशा फॅशनेबल चपला मुली भर पावसातही कॅरी करु शकतात. यामध्ये सँडल्स, बुटीज असे बरेच डिझायनर प्रकार पाहायला मिळतात. आपले मूल ५ वर्षाच्या आतले असेल तर त्याच्यासाठी पाय गुढ्यापर्यंत झाकले जाणारे गम बूटसारखे रबरी पावसाळी बूट बाजारात उपलब्ध आहेत.

### जाहिर नोटीस

दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात

पिठासन अधिकारी श्री रेवणनाथ लबडे सो.

फौज/जन्म/मृत्यू/एस.आर/१५८/२०२६

दि.२२/०६/२०२६

कु. अनघा सुखदेव लोखंडे – अर्जदार

रा. अनुपम निवास,गजानन हौ. सोसायटी

दौंड, ता. दौंड, जि. पुणे ४१३८०१

वि.

मुख्यधिकारी सो. – जाब देणार

दौंड नगरपरिषद दौंड

दौंड ता. दौंड,जि.पुणे

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार कु. अनघा सुखदेव लोखंडे हिचा जन्म दि.१६/०६/१९८२ रोजी पटेल नर्सिंग होम दौंड,ता.दौंड,जि. पुणे येथे झालेला आहे. माझ्या जन्माची नोंद दौंड नगपरिषद दौंड,ता.दौंड दप्तरी नसल्याने सदर जन्म नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी व तसा जन्माचा दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे. प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदारयांचा सदर दाखला मिळण्याचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहीर नोटीशी व्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील १५ दिवसांत जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः अगर वकिलांमार्फतलेखी हरकत उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा. मंडळ अधिकारी सो. यांच्याकडे हरकत न आल्यास तर अर्जदार कु. अनघा सुखदेव लोखंडे यांना त्यांचा जन्माचा दाखला देण्याचा आदेश देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभाग दौंड

### Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART)

**TENDER NOTICE**

**Supply, Installoation, Testing and Commissioning of 1) Maka Bharda 200Kg/ Hr 2) Vehicle 3MT**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Yashogram Mahila Farmer Producer Company Limited, AtPo Narutwadi Tal-Indapur, Dist-Pune** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **26/08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Yashogram Mahila Farmer Producer Company Limited, At Po.Narutwadi Tal-Indapur, Dist-Pune**

दिनांक १९/०८/२०२६

### जाहीर प्रसिद्धीकरण

या प्रसिद्धीकरणाद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, मौजे ग्रामपंचायत कार्यालय पाटस ता. दौंड जि. पुणे या कार्यालयाकडे श्री. सचिन बाळू जगताप रा.पाटस, ता.दौंड, जि.पुणे यांनी दिनांक १०/०८/२०२६ रोजी अर्ज व कागदपत्रे सादर करून, त्यांच्या जन्मनोंदीतील बाळाच्या आईच्या नावामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

| मुळ जन्म अभिलेखात नमुद असलेले नांव | संबंधिताचा अर्ज व आवश्यक कागदपत्रानुसार दुरुस्ती करून नोंदणी करावयाचे नांव |
|---|---|
| रेखा संतोष चांदगुडे | प्रमिला संतोष चांदगुडे |

सदर जन्म नोंद दुरुस्ती कामी त्यांनी जन्म,मृत्यू निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाटस यांचे कडे पुरावादर्शक १) मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचेकडील प्रतिज्ञापत्र २) राशन कार्ड ३) आधारकार्ड वगैरे कागदपत्रे सादर केली आहेत.

तेव्हा सदर जन्म नोंदीतील दुरुस्ती करणे बाबत कोणाचे काही लेखी म्हणणे, पुरावे दावे, हरकती असल्यास सदरचे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय पाटस ता. दौंड, जि. पुणे यांना सादर करावेत. विहीत मुदतीत कोणाचे काही लेखी म्हणणे, दावे, हरकती प्राप्त न झाल्यास सदर नोंदी बाबत कोणाचे काही म्हणणे नाही असे समजुन जन्म, मृत्यू अधिनियम १९६९ चे नमुना नं.१ मध्ये ठेवण्यात आलेल्या जन्म नोंदीत सदर अधिनियमाच्या कलम १५ नुसार वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
निबंधक
जन्म, मृत्यू तथा
ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाटस
ता. दौंड, जि. पुणे

## हास्यविनोद

**सगळं खरंखरं सांगायचं**

**मुलगी :** डॉक्टर, माझ्या पोटात कालपासून खूप कळ येतेय.

**डॉक्टर :** काल काय खाल्लं होतंस?

**मुलगी :** पिझ्झा, बर्गर, चिकन मंचुरिअन, केकचे दोन पीस, फालुदा विथ आइसक्रीम

**डॉक्टर :** ए, हा दवाखाना आहे, एफबी किंवा व्हॉटसॲप नाही. इथं मला सगळं खरंखरं सांगायचं.

**मुलगी :** शिळी फोडणीची पोळी.

■■■

पत्नीने आपल्या पतीला कॉल केला आणि विचारले, 'काय करताय?'

**पती :** 'ऑफीसमध्ये आहे...खूप बिझी आहे...!

आणि तू काय करते?

**पत्नी :** मॅक्डॉनाल्ड रेस्तराँमध्ये तुमच्या मागे मुलांबरोबर बसली आहे आणि मुले विचारत आहे, की पपांबरोबर कोणती आत्या बैसली आहे...?

■■■

पती रात्री दोन वाजता दारु पिऊन घरी येतो. त्यावेळी पत्नी दरवाजावर झाडू घेऊन उभी होती. पत्नी काहीतरी बोलणार, त्यापूर्वी पती बोलून टाकतो, किती काम करशील? रात्रीचे दोन वाजत आहे. आतापण घर स्वच्छ करतेय. चल, तुला माझी शपथ. आता झाडू ठेवून दे आणि झोप बरं. आता पतीराजांचे आयसीयूमध्ये उपचार चालू आहे.

## दुर्लक्षित केल्या जाणाऱ्या या गोष्टी पडू शकतात महागात

जर तुम्हाला वारंवार धनाची कमतरता भासत असेल आणि अडचणींना सामोरे जावे लागत असेल तर तुम्ही निश्चितच येथे सांगण्यात आलेली एखादी चूक करत असाल. ज्यामुळे देवी लक्ष्मी तुमच्यावर रुष्ट होत असेल. येथे जाणून घ्या, कोणकोणत्या दहा चुकांमुळे लक्ष्मी तुमच्यापासून दूर जाऊ शकते.

◆ शास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे की, सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी स्त्री-पुरुषाने समागम करू नये. ज्या घरात दिवसा स्त्री-पुरुष समागम करतात त्या घरात लक्ष्मीचा वास राहत नाही.

◆ जर तुम्ही रात्रीचा स्वयंपाक केलेले भांडे रात्रभर तसेच खरकटे ठेवून सकाळी उठून घासत असाल तर ही सवय बदलून टाका. असे केल्याने घरामध्ये धनाची देवी लक्ष्मी थांबत नाही.

◆ जर तुम्ही तुटलेल्या कंगव्याने केस विंचरत असाल तर हा धन प्राप्तीमध्ये अपशकून मानला जातो.

◆ जर तुम्हाला नख चावण्याची किंवा कुरतडण्याची सवय असेल तर ही सवयसुद्धा धन प्राप्तीसाठी ठीक नाही. या सवयीमुळे तुमचे शरीर अपवित्र होते आणि यामुळे देवी लक्ष्मी रुष्ट होते.

◆ रात्री हात-पाय न धुता झोपत असाल किंवा ओले पाय तसेच ठेऊन झोपण्याची सवय असेल तर हा धन प्राप्तीसाठी शुभ शकुन नाही.

◆ ज्या घरांमध्ये पूजा किंव आरतीचा दिवा फुंकर मारून विझवला जातो, त्या घरात देवी लक्ष्मी थांबत नाही. यामुळे दिवा कधीही स्वतः विझवू नये.

◆ ज्या घरांमध्ये नियमित शंखध्वनी होत नाही आणि देवी-देवतांबद्दल अपशब्द काढले जातात अशा घरामध्ये देवी लक्ष्मी कधीही निवास करत नाही.

◆ ज्या घरांमध्ये सूर्यास्तानंतर झाडून काढले जाते, अशा घरामध्ये लक्ष्मी राहणे पसंत करत नाही. अशा घरामध्ये लक्ष्मीची बहिण अलक्ष्मी प्रवेश करते.

◆ शास्त्रामध्ये सांगण्यात आले आहे की, ज्या घरामध्ये पितृपक्षात पितरांचे श्राद्ध केले जात नाही, तेथे लक्ष्मी वास्तव्य करत नाही.

◆◆◆

### सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक ३१.०७.२०१६**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-१८२५/२८३/प्र.क्र.७७/२०२५/नवि-१३ :-** ज्या महाराष्ट्र शासनाने राज्यातील न्य महानगरपालिका व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उरत सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमा उल्लेख नियमावली असा करण्यात आलेला आहे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (धापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना. टिएस-१८२८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो.व प्रायो./कलम ३७ (१कक) (म) व कलम २०(४)/ नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये अधिसूचनेनुसार मंजूर पुणे प्रादेशिक योजनेतील सेक्टर-१२ वाक्यापुढे ज्याचा उल्लेख उक्त सेक्टर असा करण्यात आला आहे उक्त नियमावलीमध्ये एकात्मिकृत नगर बसाहत प्रकल्पांचा विकास प्रतिबंधित करण्यात आलेला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त सेक्टरमधील वाढत्या मागशोच्या प्रमाणात नियोजनबध्द विकास होण्याच्या अनुषंगाने उक्त सेक्टरमध्ये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गत मर्यादित स्वरुपाचा विकास अनुशं करण्याकरीता उक्त नियमावलीत सुधारणा करणं अत्यावश्यक असल्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेली आहेत;

आणि ज्याअर्थी स्थितीत सेक्टर मध्ये हत्या मागणीनुसार, विशेषतः लोणावळा परिसरात मोठ्या प्रमाणात घरांची बांधकामे होऊन विकास होत आहे. सदर जमिनीवर घराची बांधकामे करता रेखांकन आराखडा करताना लहान भूखंडावर बंगल्यांच्या स्वरुपात विकास होत असून यामुळे कमी रुंदीचे रस्ते, कमी मोकळी जागा अपुरे सुविधा क्षेत्र तयार होत आहेत;

आणि ज्याअर्थी, सदर ठिकाणी ढझ च्या माध्यमातून सदर क्षेत्रामध्ये मर्यादितचाविका अनुज्ञेय केल्यास सदर ठिकाणी नियोजन का विकास पुरेशी खुली जागा, सुविधा क्षेत्रे प्रशस्त रस्ते व इतर नियोजनाच्या दृष्टीने विकास करता येऊ शकेल;

आणि ज्याअर्थी उक्त निबंद व नियोजनाच्या दृष्टीकोन उक्त नियमातील प्रकरण ५ मधील FOR PUNE REGIONAL PLAN मध्ये सोबतच्या परिशिष्ट अ' मध्ये नमूद्र तरतुदीचा समावेश करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त फेरबदल असा करण्यात आलेला आहे);

उक्त अधिनियमाचे कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तीचा वापर करून फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दाखल करता येतील. न्यानुसार सहसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांना प्राप्त सूचना/हरकतीवर सुनावणी देऊन आणि संधित नियोजन प्राधिकरण म्हणजे अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१. संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. विभागीय आयुक्त पूर्ण विभाग
३. पुणे जिल्हाधिकारी
४. मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद
५. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे,
६. व्यवस्थापक संचालक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.
७. विभागीय सहसंचालक, नगर रचना पुणे विभाग.
८. मुख्याधिकारी लोणावळा नगर परिषद.

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.marashtra.gov.in (कायदे नियम) पर उपलब्ध राहील

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(प्रणय कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट 'अ'**

शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्र. टिपीएस-१८२५/२८३/प्र.क्र.७७/२०१५/नवि-१२. दि.३१.०७.२०२६ सोबतचे सहपत्र

| Regulation No. | Proposed Provision |
|---|---|
| 5.9 FOR PUNE REGIONAL PLAN | Regulation No.5.9.2 FTP- Regulations for Planning -reas of Sector R of Regional Plan of Pune Region<br>Integrated Township Project is permitted in Sector R of Regional Plan of Pune Region with following conditions.<br>i. FSI shall be limited to 10 as basie FSE along with additional Ancillary FSI only.<br>ii. Maximum Height of building shall be permitted upto 45 meters.<br>iii. The mandatory amenities of ITP shall be provided in proportion with consumption of FS<br>iv. Remaining provisions of ITP from Regulation No.14.1.1 shalt te applicable in toto. |

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.*

सही/-
(प्रणय कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**विमाका/पुणे/जाहि./१३०/२०२६-२०२७**

## कच्चा लसूण व कांदा झोपेसाठी उपयोगी

सुजैविकांनी युक्त असलेले चोथायुक्त अन्न सेवन केल्याने झोपेचा दर्जा सुधारतो, त्यात कच्चा लसूण, कांदा यांचे सेवन उपयुक्त ठरते. तसेच शारीरिक ताणही कमी होतो. असे नवीन संशोधनात म्हटले आहे. सुजैविकांमुळे आतड्यातील चांगले जिवाणू सुरक्षित राहतात. अमेरिकेतील कोलोरॅडो विद्यापीठातील संशोधक रॉबर्ट थॉमसन यांनी म्हटले आहे की, सुजैविकेयुक्त नैसर्गिक अन्न आरईएमव्यतिरिक्त व आरईएमयुक्त झोप (रॅपिड आय मूव्हमेंट) सुधारते.

**तळेगाव दाभाडे नगरपरिषद**
**तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे**
दूरध्वनी क्र : १८००-२३३-२०३
ई-मेल : tologoorlabhadr@gmail.com
संकेतस्थळ : www.lnigaondabhdemc.org

जा.क्र. २०२६/भांडार-१३/३१९५/०२६ — दिनांक १८/०८/२०२६

### निविदा जाहिरात

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या भांडार विभागामार्फत तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या गणेशोत्सव २०२६ करिता वाहने भाड्याने पुरविणेचे दर मागविणे बाबत. (१ चालक २ मदतनीस व इंधानासाहित दर देणे.) करणेसाठी मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. मागविण्यात येणाऱ्या ऑफलाईन निविदा फॉर्म कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. तसेच निविदा प्रक्रियेचा संपुर्ण तपशील आपणास नगरपरिषदेच्या सुचना फलकावर पाहण्यास उपलब्ध आहेत.

शिक्का

सही/-
(सुप्रिया शिंदे)
उपमुख्याधिकारी
तळेगाव दाभाडे नगरपरिषद

# विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा द्यावी; कुलगुरूंना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या सूचना

## विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधून विद्यार्थ्यांच्या समस्या तत्काळ सोडवा

■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई : विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत आरोग्यसुविधा आणि विद्यार्थीपूरक वातावरण उपलब्ध करून देणे विद्यापीठांची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आणि सर्वांगीण विकासाला पूरक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठांनी अतिशय संवेदनशीलतेने आणि तत्परतेने कार्य करावे अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिल्या.



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक मंत्रालयात झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांच्या सूचना, अपेक्षा आणि शैक्षणिक गरजांबाबतही सविस्तर चर्चा झाली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, विद्यार्थ्यांच्या अडचणी ऐकून त्यावर तातडीने आणि ठोस कार्यवाही करावी. आरोग्य सुविधांबाबत विशेष संवेदनशीलता दाखवून विद्यार्थ्यांना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देऊन शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम कराव्यात, असे निर्देश मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उप सचिव अशोक मांडे, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष तथा माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर (ऑनलाइन) तसेच राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू ऑनलाइन उपस्थित होते.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी कुलगुरूंनी नियमित संवाद साधावा. विद्यार्थ्यांच्या समस्या, प्रश्न आणि सूचनांची माहिती घेऊन त्यावर आवश्यक उपाययोजना कराव्यात. या संवादातून समोर आलेल्या प्रश्नांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करावा, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

# गणेशोत्सवाचे वैश्विक अद्वितीय मूल्य' अधोरेखित करुया; सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन





■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई :आपला गणेशोत्सव हा वैश्विक अद्वितीय मूल्य असलेला उत्सव असून त्यामुळेच त्याला राज्य महोत्सवाचा दर्जा शासनाने दिला आहे. आता यापुढील काळात विविध आकडेवारीचे संकलन व विश्लेषण करुन या उत्सवाची अभ्यासपूर्ण नियोजनबध्द मांडणी जगासमोर करुन पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक चळवळीची १०० वर्षाहून अधिक परंपरा असलेल्या या उत्सवाचे वैश्विक अद्वितीय मूल्य जगासमोर आणूया, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यानंतर उत्सवाचे हे दुसरे वर्षे असून, महाराष्ट्रासह जगभर साजरा होणाऱ्या गणेशोत्सवामध्ये सुसूत्रता यावी व नियोजनबद्ध उत्सव साजरा व्हावा या दृष्टीने सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी याबाबत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे दोन वेगवेगळ्या बैठका घेतल्या. सांस्कृतिक कार्य विभाग व सर्व जिल्हाधिकारी व राज्याचे पोलीस, वाहतूक व जिल्हाधिकाऱ्यांची बैठकीत उत्सव आयोजनाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या. तर दुसरी बैठक गणेशोत्सव समन्वय महासंघ, समन्वय समिती, मूर्तीकार संघ यांच्यासह महापालिका, पोलीस, एसटी महामंडळ, रेल्वे, पोलीस तसेच सांस्कृतिक कार्य विभाग यांची संयुक्त बैठक मंत्री शेलार यांनी घेऊन गणेशोत्सवाबाबत येणाऱ्या अडचणी, समजून घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी अधिकाऱ्यांना सूचना करताना मंत्री शेलार यांनी सांगितले की, गतवर्षीपर्यंत आपण शासन म्हणून परवानगी देणारे होतो, पण आता आपण राज्य महोत्सव म्हणून गणेशोत्सवाला दर्जा दिल्यामुळे शासनसुध्दा आयोजक आहे. त्या पध्दतीने आता काम करणे आवश्यक आहे. एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात जगभर साजरा होणाऱ्या गणेशोत्सवात वैश्विक अद्वितीय मुल्यं आहेत. आता आपणाला याबाबत एक सुसूत्रता आणून त्यामधील उपक्रम, कार्यक्रम वाढवून त्याचा डेटा शास्त्रशुध्द पध्दतीने संकलित करुन तो जगासमोर मांडण्याची गरज आहे. त्यादृष्टीने नियोजन व आयोजन करायचे आहे. याशिवाय सार्वजनिक स्वरूपात हा गणेशोत्सव आपण साजरा करत आहोतच पण महाराष्ट्रामधील असंख्य घराणी ही वर्षानुवर्ष घरगुती गणेश उत्सव अत्यंत नाविन्यपूर्ण आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरे करत आहेत.

# पोषण आहार, गणवेश व शालेय सुविधांमध्ये तडजोड नाही : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

## दर्जा, स्वच्छता आणि विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य

■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई : शाळांमधील पोषण आहाराचा दर्जा आणि स्वच्छता याबाबत सर्व संबंधितांनी गांभीर्यपूर्वक काम करावे. शाळांमध्ये प्रत्यक्षात दर्जेदार सुविधा उपलब्ध आहेत की नाहीत, याची शिक्षणाधिकाऱ्यांनी काटेकोर तपासणी करावी, असे सांगून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, मोफत गणवेश योजना तसेच शाळांमधील भौतिक सुविधांच्या अंमलबजावणीत तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. गुणवत्तापूर्ण शिक्षणाला शालेय शिक्षणाचे प्राधान्य असल्याचे सांगून पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, ई-सुविधा, प्रयोगशाळा, क्रीडांगणे याकडे विशेष लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली.



प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, मोफत गणवेश योजना आणि शाळांमधील भौतिक सुविधांबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात आयोजित राज्य पातळीवरील शिक्षणाधिकाऱ्यांच्या ऑनलाईन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वसेकर, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, उपसचिव तुषार महाजन यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री दादाजी भुसे यांनी, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे अन्नधान्य गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक असून अन्न साठवणुकीची जागा, स्वयंपाकाची जागा आणि विद्यार्थ्यांच्या भोजनस्थळाची स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे सांगितले. शाळेत दर्जा, प्रमाण आणि स्वच्छतेच्या बाबींची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि संबंधित अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाचा दर्जा उत्कृष्ट असल्याबाबत तपासणी करुन तातडीने अहवाल सादर करण्यात यावा. निकृष्ट दर्जाच्या गणवेशांसंदर्भात पुरवठादारांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच मुख्याध्यापक, व्यवस्थापन समिती आणि शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी, असे त्यांनी सांगितले. शाळांमधून विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृहे तातडीने उपलब्ध करण्याचे निर्देश देऊन स्वच्छतागृहे वापरण्यायोग्य, स्वच्छ आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ असावीत, यावर त्यांनी भर दिला. शासन आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असले तरी त्यांची देखभाल स्थानिक स्तरावर प्रभावीपणे होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळांच्या भौतिक सुविधांच्या कामांसाठी जिल्हा नियोजन समिती, रोजगार हमी योजना, गौण खनिज निधी, लोकप्रतिनिधींचा विकास निधी तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून प्रयत्न करण्याची सूचना मंत्री भुसे यांनी केली. आकांक्षित जिल्हे व तालुक्यांमध्ये शिक्षणाबरोबरच आरोग्यालाही प्राधान्य देण्याचे निर्देश देत चांगले काम करणाऱ्या तालुक्यांना पुरस्कार देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा प्रवेशोत्सव आणि स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित उत्कृष्ट कवायतींसह विविध उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करून शाळांमध्ये समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांचे आणि अधिकाऱ्यांचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले.

# पुण्यात होणार युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप-२०३२; स्पर्धा आयोजनाला शासनाचे पाठबळ

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : ग्रँड टूर – २०२६ स्पर्धेच्या यशस्वी आयोजनानंतर आता युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप – २०३२ चे यजमानपद पुण्याला मिळणार आहे. या स्पर्धा संयोजनासाठी शासनाकडून समर्थनपत्र, आर्थिक हमी, पायाभूत सुविधा व कार्यान्वयनविषयक विविध बाबींना धोरणात्मक मान्यता देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. युसीआय वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२ च्या निमित्ताने आशियातील पहिले यजमान पद भारताकडे येणार आहे. स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे ३३० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होणे अपेक्षित आहे.

पुणे जिल्हा प्रशासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे ग्रँड टूर – २०२६ यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली होती. या भारतातील पहिल्या युनियन सायक्लिस्ट इंटरनॅशनल (युसीआय) स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा लौकिकात आणखीच भर पडली. स्पर्धेतील उत्कृष्ट नियोजन, आंतरराष्ट्रीय दर्जाची अंमलबजावणी, सुरक्षा व्यवस्थापन व तांत्रिक क्षमतेची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली असून, या स्पर्धेचा दर्जा युसीआय २.२ वरून युसीआय २.१ असा उन्नत करण्यात आला आहे.

या यशस्वी आयोजनामुळे पुणे जिल्हा, महाराष्ट्र व भारताची आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील विश्वासार्हता व क्षमता सिद्ध झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याला सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) व पुणे ग्रँड टूर आयोजन समितीला युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप, २०३२ ची संधी मिळणार आहे. या स्पर्धेमुळे किमान शंभर देशातील २५ ते ३० कोटी क्रीडा रसिकांपर्यंत महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती पोहचणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याला दख्खनचे प्रवेशद्वार (गेट वे टू डेक्कन) या संकल्पनेतून जागतिक सायकलिंगच्या नकाशावर स्थान मिळणार आहे.

जागतिक किर्तीच्या टूर द फ्रान्सच्या धर्तीवर आयोजित होणारी ही स्पर्धा पुणे जिल्ह्यातील २५० ते २८० किलोमीटर्स लांबीच्या रस्त्यांवर आयोजित केली जाईल. त्यामध्ये सुमारे जगभरातून एक हजाराहून अधिक खेळाडू सहभागी होऊ शकतात. या आठ दिवसांच्या स्पर्धेच्या यजमान शहर म्हणून आणि आयोजनासाठी युसीआयकडे शासनाचे समर्थनपत्र द्यावे लागणार आहे. त्यासाठी, निविदा शुल्क भरणे, उमेदवारी अर्ज भरणे, करार, पूर्व – स्पर्धा नियोजन याकरिता आवश्यक बाबींना व स्पर्धेच्या प्रभावी नियोजन अंमलबजावणीसाठी संघटनात्मक रचनेस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या समितीत उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री, उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री तसेच ग्रामविकास मंत्री, पर्यटन मंत्री, राज्याचे मुख्य सचिव यांच्यासह पोलीस महासंचालक, विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, सदस्य सचिव म्हणून विभागीय आयुक्त अशा सुमारे अठरा सदस्यांचा समावेश असेल. तर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संचलन समिती, विभागीय आयुक्त यांच्या अध्यतेखाली आयोजन समिती काम पाहणार आहे. स्पर्धा आयोजनासाठीचा ९९ कोटी रुपयांचा निधी प्रामुख्याने सीएसआर प्रायोजकत्व, व्यावसायिक महसुलाच्या आधारे उभारण्यात येईल.

# जलदूत बनून पाण्यासाठी चालूया; जलसमृद्ध महाराष्ट्रासाठी एकत्र येऊया...

■ जनप्रवास प्रतिनिधी

महाराष्ट्र समृद्ध, हिरवागार आणि जलसमृद्ध व्हावा, यासाठी जलसंधारण ही केवळ शासनाचीच जबाबदारी न राहता ती लोकचळवळ होणे आवश्यक आहे. याच व्यापक उद्देशाने मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त राज्यभर विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा केला जातो. यंदा १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत जलसंधारणाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यातील प्रमुख उपक्रम म्हणजे २१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येणारी महा वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर'. हा उपक्रम या राज्यव्यापी उपक्रमातून जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्याबरोबरच नागरिकांमध्ये पाण्याच्या संवर्धनाची जबाबदारी आणि त्यातील आपली भूमिका याविषयी जागर



निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

वॉक फॉर वॉटर' लोकजागृती अभियानाचे प्रतीक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना या महत्त्वपूर्ण जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः तरुणांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून जलसंधारणाचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. वॉक फॉर वॉटर' ही केवळ एक वॉकेथॉन नसून, पाण्याचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या व्यापक लोकजागृती अभियानाचे प्रतीक आहे. पाण्याची उपलब्धता, त्याचे संवर्धन आणि भविष्यातील पाणी सुरक्षेसाठी आजपासूनच सामूहिक प्रयत्न करण्याची गरज या माध्यमातून अधोरेखित केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी या मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

महावॉकेथॉन २०२६ आणि मृद व जलसंधारण रील्स स्पर्धा : मृद व जलसंधारण विभागामार्फत स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण सप्ताह व अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत महावॉकेथॉन २०२६ आणि मृद व जलसंधारण रील्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महावॉकेथॉन २०२६ मध्ये ३ कि.मी. चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये पाणी वाचवा, पाणी जपा आणि सुरक्षित भविष्य घडवा हा संदेश देण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम पुरस्कार २५ हजार रुपये आणि गौरव चिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार रुपये आणि गौरव चिन्ह तर तृतीय पुरस्कार १० हजार रुपये आणि गौरव चिन्ह देण्यात येणार आहे. तसेच ईश्वरी चिठ्ठीद्वारे सात सहभागींना प्रत्येकी ३ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

व्यापक लोकसहभाग आवश्यक

महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण आणि भौगोलिक परिस्थिती जिल्हानिहाय वेगळी आहे. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे उपलब्ध पावसाच्या प्रत्येक थेंबाचे योग्य व्यवस्थापन, पाणी अडविणे, पाणी जमिनीत मुरविणे आणि भूजल पातळी वाढविणे यासाठी व्यापक लोकसहभाग आवश्यक आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा' हा केवळ घोषवाक्यापुरता मर्यादित न राहता तो दैनंदिन जीवनाचा आणि सामूहिक प्रयत्नांचा भाग बनणे ही काळाची गरज आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि नागरिकांचे जीवनमान यांना दीर्घकालीन आधार मिळू शकतो. त्यामुळे पाण्याचे संवर्धन ही भविष्यातील पिढ्यांसाठी जबाबदारीदेखील आहे.

जनजागृती अभियानाला आधुनिक माध्यमांची जोड देत युवा पिढीपर्यंत जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये रील्स स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून तरुणांनी जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि जलस्रोतांचे संरक्षण यांसारख्या विषयांवर सर्जनशील पद्धतीने जनजागृती करावी, हा या स्पर्धेमागील उद्देश आहे. युवा पिढीची सर्जनशीलता आणि डिजिटल माध्यमांची पोहोच यांचा प्रभावी संगम या माध्यमातून साधला जाणार आहे.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com